# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ०९ डिसेंबर, २०१६ / अग्रहायण १८, १९३८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | वित्त व नियोजन, वने मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | ग्रामविकास, महिला व बाल विकास मंत्री | |
| (३) | वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री | |
| (४) | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री | |
| (५) | जलसंधारण, राजशिष्टाचार मंत्री | |
| (६) | रोजगार हमी योजना, पर्यटन मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५३**

---

### मौजे लांडेवाडी (त्रिमली) (ता.खटाव, जि.सातारा) येथे गायरान जमिनीवर अनधिकृतरित्या पवनचक्या उभारल्याबाबत

**(१) * ६८६८८ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे लांडेवाडी (त्रिमली) (ता.खटाव, जि.सातारा) येथे गायरान जमिनीवर केनर्सीस इंडिया कंपनीने अनधिकृतरित्या पवनचक्या उभारल्याने सदर गावच्या सरपंचाने दिनांक १५ सप्टेंबर, २०१६ रोजीपासून आझाद मैदान, मुंबई येथे उपोषण केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, तदनुसार गायरानाशिवाय अन्य ठिकाणी पवनचक्या उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सदर गावच्या सरपंचाने दि.१५ सप्टेंबर, २०१६ रोजीपासून आझाद मैदान, मुंबई येथे उपोषण केले, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी मा.मंत्री (न.व न.ऊ.) यांनी दि.१९.१०.२०१६ रोजी झालेल्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी, सातारा यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हुपरी (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील ग्रामपंचायतीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(२) * ६६६६३ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हुपरी (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील ग्रामपंचायतीमध्ये सुमारे १ कोटी ६५ लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्या प्रकरणी लेखापरिक्षणानुसार दोषी ठरलेल्या ५ माजी सरपंचासह ५१ ग्रामपंचायत सदस्य, १२ ग्रामविकास अधिकारी, ८ कर्मचारी अशा सर्वांकडून रक्कम वसूल करुन त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत याकरिता हुतात्मा चिटणीस चौकात जन आंदोलनाच्या कार्यकर्त्यांनी दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास उपोषण केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार संबधित दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) होय, अंशत: खरे आहे.

ग्रामपंचायत हुपरी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे सन १९९९-२००० ते २०११-२०१२ या कालावधीतील लेखापरिक्षणानुसार रुपये १,६६,०६,३०५/- इतका निधी आक्षेपार्ह आढळून आला आहे. त्यापैकी संबंधित सरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामपंचायत कर्मचारी यांचेकडून रुपये १,०८,२३,०१२/- इतका निधी वसूल व समायोजित केला असून उर्वरित रुपये ५७,८३,२९३/- इतका निधी वसूल करावयाचा बाकी आहे. त्यास जबाबदार असलेल्या तत्कालीन ९ सरपंच,७६ ग्रामपंचायत सदस्य व १९ ग्रामविकास अधिकारी यांना ऑक्टोबर, २०१६ मध्ये नोटीसा लागू केलेल्या असून, वसुलीची कारवाई प्रस्तावित केलेली आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**खानापूर जामगाव (ता.परांडा, जि.उस्मानाबाद) शिवारातील पाझर तलावाची दुरुस्ती करण्याबाबत**

**(३) * ६६३३२ श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर जामगाव (ता.परांडा, जि.उस्मानाबाद) शिवारामधील पाझर तलावाच्या भरावास भेगा पडल्याने यावर्षी पावसाळयात साठलेले पाणी वाहून जाऊन या परिसरातील शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये निदर्शनास आणले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खानापूर जामगाव शिवारामधील पाझर तलावाची तातडीने दुरुस्ती केली नाहीतर तलाव फुटून शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पाझर तलावाच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय,हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) स्थानिक लोकप्रतिनिधींच्या निवेदनाच्या अनुषंगाने क्षेत्रिय अधिका-यांनी सदर तलावाची सविस्तर पाहणी केलेली असून, शासन निर्णय दिनांक ०७/११/२०१३ नुसार सदर पाझर तलावाच्या दुरूस्तीचे अंदाजपत्रक करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथील शासकीय प्रसुतीगृहातील स्त्रीरोगतज्ञांच्या रिक्त पदांबाबत

**(४) * ६६१०१ श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील शासकीय प्रसुतीगृहात स्त्रीरोगतज्ञांची पदे रिक्त असल्यामुळे गरोदर स्त्रियांना वैद्यकीय सेवेपासून वंचित रहावे लागत असल्याची बाब दिनांक २७ जुलै, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने कोट्यवधी रुपये खर्चून या रुग्णालयाची खाटांची क्षमता ५० वरून १०० खाटांपर्यंत वाढविली परंतु त्यानुसार डॉक्टर व इतर कर्मचाऱ्यांची पदे न भरल्यामुळे व एक महिला डॉक्टर ३ वर्षापासून रुग्णालयात अनुपस्थित असल्याने रुग्णालयाची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रुग्णालयातील या समस्यांबाबत स्थानिक अपंग सेवा संघाने मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना निवेदन देऊन उपाययोजना करण्याची विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार या रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे.

शासकीय प्रसुतीगृह व दवाखाना, उल्हासनगर-४ जि.ठाणे येथे स्त्रीरोगतज्ञाचे १ पद रिक्त असून ३ पदे भरलेली आहेत. त्यापैकी २ स्रीरोगतज्ञ प्रसुती रजेवर असून १ स्रीरोगतज्ञ कार्यरत आहे व १ स्त्रीरोगतज्ञाची सेवा कंत्राटी तत्वावर on call basis उपलब्ध करुन घेण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही,

सद्यस्थितीमध्ये शासकीय प्रसुतीगृह व दवाखाना, उल्हासनगर हे ५० खाटांचे रुग्णालय असून तेथे उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचा-यांमार्फत रुग्णांना आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहेत.

सदर रुग्णालयास स्रीरोगतज्ञाची आवश्यकता लक्षात घेता बालसंगोपन रजेवर असलेल्या स्रीरोगतज्ञास तात्काळ हजर होणेबाबत कळविण्यात आले आहे.

(३) होय.

(४) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड पे.रु.६६००) संवर्गाची रिक्त पदे नामनिर्देशनाने व पदोन्नतीने भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जांबरुग (ता.कर्जत, जि.रायगड) येथे जलयुक्त शिवार योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(५) * ६५५६७ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील जांबरुग विभागामध्ये सन २०१४-१५ मध्ये जलयुक्त शिवार व पाणलोट कामात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याची

मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलसंधारणाच्या दृष्टीने सदर कामे निकषानुसार पूर्ण होणे गरजेचे असताना निकषांना डावलून काम झाल्याची बनावट देयके तयार करून संबंधित अधिकारी व ठेकेदार यांनी शासकीय रक्कमेचा गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार या योजनेमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत जामरूंग, ओलमन व मांडवणे या तीन गावांचा समावेश करण्यात आला आहे. सदर गावात रू.१२५.०७ लक्ष ची २० कामे प्रस्तावित होती त्यापैकी १९ कामे पूर्ण करण्यात आली असून त्यावर रू.११३.३१ लक्ष खर्च करण्यात आला आहे. उर्वरित एक काम प्रगतीपथावर आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**ठाणे जिल्हा (सिव्हिल हॉस्पिटल) रुग्णालयाच्या श्रेणीवर्धनाबाबत**

**(६) * ६७३२९ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील सिव्हिल हॉस्पिटल या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा शासकीय रुग्णालयाची इमारत अत्यंत जुनी झाली असल्याने या जागेवर नवीन इमारत बांधून ५७४ खाटांचे रुग्णालय उभारण्याचा निर्णय माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नव्याने होणाऱ्या रुग्णालयामध्ये कर्करोग व हृदयरोग यासारख्या गंभीर आजारांवर उपाय करणाऱ्या विभागांचा समावेश करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा शासकीय रुग्णालयाची नवीन इमारत उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय. "जिल्हा रुग्णालय ठाणे ३६१ बेडचे हॉस्पीटल असून ते ५५० बेडचे करण्याची बाब प्रस्तावित असून त्यामध्येच सुपर स्पेशालिटीच्या सेवा इन्क्लूड करण्यात येतील" असे सभागृहास आश्वासन देण्यात आले होते.
(२) होय.
(३) ठाणे जिल्हा रुग्णालयाच्या श्रेणीवर्धनाची बाब प्रस्तावित जोड बृहत आराखडयात समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात कुष्ठरुग्णांची संख्या वाढत असल्याबाबत

**(७) * ६५८६६ श्री.सुनिल शिंदे (वरळी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.पास्कल धनारे (डहाणू), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात माहे मार्च, २०१५ ते मार्च, २०१६ या कालावधीत घेण्यात आलेल्या सर्वेक्षणात १२६१५ कुष्ठरुग्ण आढळल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाचे आयुक्त यांनी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान जाहिर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राप्त सर्वेक्षणानुसार मुंबई शहरात ३६० कुष्ठरुग्ण आढळले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील कुष्ठरोगावर नियंत्रण मिळविण्यासाठी राज्य शासनाकडून कोणत्या परिणामकारक उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) राज्यात माहे मार्च, २०१५ ते मार्च, २०१६ कालावधीत एकूण १७३२० कुष्ठरुग्ण शोधून उपचाराखाली आणले होते. मार्च, २०१६ अखेर १०१०३ कुष्ठरुग्ण उपचाराखाली होते.
(२) मार्च, २०१५ ते मार्च, २०१६ या कालावधीत मुंबई शहरात ५३१ कुष्ठरुग्ण शोधून उपचाराखाली आणले होते. तसेच मार्च, २०१६ अखेर ३३९ रुग्ण उपचाराखाली होते.
(३) कुष्ठरोगासंबंधी रोगप्रतिबंधक उपायाकरीता कुठल्याही प्रकारची प्रतिबंधकात्मक लस नाही. कुष्ठरोगास आळा घालण्याकारीता सर्वसाधारण आरोग्य सेवेमधील आरोग्य कर्मचारी, आशा वर्कर यांचेमार्फत घरोघर सर्वेक्षण करुन संशयित शोधून वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत रुग्णाचे लवकरात लवकर निदान करुन नियमितपणे बहुविध औषधोपचार हा एकमेव उपाय असल्याने समाजातील लपून राहिलेल्या रुग्णांना लवकरात लवकर निदान करुन सर्व शासकीय व निमशासकीय दवाखान्यांमध्ये नियमितपणे मोफत बहुविध औषधोपचार देण्यात येतो.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार दरवर्षी विशेष कुष्ठरोग शोध मोहिमचे आयोजन केले जाते. सर्वसामान्य जनतेला कुष्ठरोग विषयक शास्त्रीय ज्ञान प्राप्त होवून कुष्ठरुग्णाने स्वत:हून तपासणीसाठी जवळच्या आरोग्य केंद्रात यावे या करीता आरोग्य शिक्षण व जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

तसेच मोक्याच्या ठिकाणी प्रदर्शने, बॅनर्स, पोर्स्टर्स, होर्डींग, भिंतीवरील म्हणी, हस्तपत्रिका वाटप करणे इ. उपक्रम घेतले जातात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विरसई (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र मंजूर करण्याबाबत

**(८) * ७०८६८ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरसई (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील ग्रामीण व दुर्गम भागातील लोकांना शासकीय वैद्यकीय सेवा मिळण्यासाठी प्राथमिक आरोग्य उपकेंद्र प्राधान्याने मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनाच्या अनुषंगाने विरसई येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे. मा.श्री.अनंत गीते, केंद्रीय अवजड उद्योग मंत्री तसेच श्री. संजय कदम, विसस यांनी मा.मंत्री (सार्व. आ. व कु.क.) विरसई, ता.दापोली, जि.रत्नागिरी येथे आरोग्य उपकेंद्र मंजूर होण्याबाबत निवेदन दिले आहे.

(२) सन २००१ च्या बृहत आराखडयाच्या लोकसंख्येच्या निकषानुसार विरसई येथे उपकेंद्र मंजूर करणे शक्य नाही ही बाब जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी यांनी संबंधितांना कळविली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वरोरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील पारडी-अकोला या मार्गाची झालेली दुरवस्था

**(९) * ६६७४० श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील पारडी-अकोला या मार्गाची दुरवस्था झाल्यामुळे माहे सप्टेंबर, २०१६ रोजीपासून बस सेवाही बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी तेथील नागरिकांनी वारंवार संबंधितांकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय, हे खरे आहे. तथापि सदर रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली असून सद्यस्थितीत बस सेवा सुरु आहे.
(३) पारडी अकोला हा ग्रामीण मार्ग क्र.१२७ दर्जाचा रस्ता आहे. या रस्त्याची लांबी १.५० कि.मी. असून डांबरी पृष्ठभागाचा आहे. सदर रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली असून रस्ता वाहतूकीस योग्य आहे. सद्यस्थितीत बस सेवा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील आदिवासी भागात बालक व माता मृत्यूच्या प्रमाणात झालेली वाढ**

**(१०) * ६५३०५ श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.विजय वड्डेटीवार (ब्रम्हपूरी), श्री.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी भागात १७००० बालकांचा व मातांचा मृत्यू झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असून, शहापूर व डोळखंब (जि.ठाणे) केंद्रांतर्गत माहे जानेवारी ते जून, २०१६ या सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये २८ बालमृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच अमरावती जिल्ह्यातील मेळघाटात सन २०१५ ते २०१६ या कालावधीत कुपोषणामुळे २८३ जणांचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील आदिवासी भागातील या बाल व माता मृत्यूची कारणे काय आहेत
(४) असल्यास, आदिवासी भागात बाल व माता मृत्यू होऊ नयेत यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) राज्यातील १६ आदिवासी जिल्ह्यातील सन २०१५-१६ यावर्षी ६५८९ बाल मृत्यू (० ते ६ वर्ष) व ३०६ माता मृत्यू झाले आहेत. तसेच सन २०१६-१७ मध्ये माहे ऑगस्ट २०१६ पर्यंत १४५४ बाल मृत्यू (० ते ६) व १५३ माता मृत्यू झाले आहेत.
शहापूर व डोळखंब (जि.ठाणे) केंद्रांतर्गत माहे जानेवारी ते जून २०१६ या कालावधीमध्ये डोळखंब येथे ४ व शहापूर येथे २९ असून एकूण ३३ बाल मृत्यू झालेले आहेत.
(२) सन २०१५-१६ मध्ये अमरावती जिल्ह्यातील मेळघाट भागातील २८३ बालमृत्यू हे कुपोषणामुळे झालेले नसून ते न्युमोनिया, जन्मत: कमी वजन, कमी दिवसांची प्रसुती, एस्पेक्झीया व जंतुदोष या विविध आजाराने झालेले आहेत.
(३) न्युमोनिया, जन्मत: कमीवजन, कमी दिवसांची प्रसुती, एस्पेक्झीया व जंतु दोष ही बाल मृत्यूची प्रमुख कारणे असून, रक्तस्त्राव, एकलेम्पशिया, गर्भपिशवीफाटणे, रक्तक्षय व जंतुदोष ही माता मृत्यूची प्रमुख कारणे आढळून आली आहेत.
(४) या विभागातर्फे बाल मृत्यू व माता मृत्यू रोखण्यासाठी प्रभावीपणे योजना राबविल्या जातात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील दिवेआगर या धार्मिक व पर्यटन स्थळाची विकास कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(११) * ६५३३८ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील दिवेआगर या जगप्रसिध्द धार्मिक व पर्यटन स्थळाच्या विकास कामांसाठी ९ कोटीचा निधी उपलब्ध करुन दिला असून त्यापैकी ८.५ कोटीचा निधी खर्च झालेला असताना अद्याप पर्यटन केंद्राची विकासाची कामे अपूर्णावस्थेत असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, सदरहू पर्यटन विकासाचे काम शीघ्रगतीने पूर्ण करुन पर्यटन केंद्र कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१), (२), (३) व (४) दिवेआगर, ता.श्रीवर्धन, जि.रायगड या धार्मिक व पर्यटन स्थळाच्या विकास कामांसाठी रुपये ९९१.३७ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे व त्यापैकी रुपये ९०१.६४ लक्ष इतका निधी खर्च करण्यात आलेला आहे. या कामांमधील श्री क्षेत्र दिवेआगर येथील सुवर्ण मंदीराचे काम अंतिम टप्प्यात असून डिसेंबर, २०१६ अखेर पुर्ण करण्याचे नियोजित आहे. चार कामे पुर्ण झाली आहेत.

-----------------

**वाशिम व जळगाव जिल्हयातील पोषण आहाराच्या पाकीटात मृत बेडूक व अळया सापडल्याबाबत**

**(१२) * ६५१९७ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी),**

**श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्यंकटेश्वरा महिला औद्योगिक उत्पादन सहकारी संस्था लि. उदगीर या संस्थेकडून वाशिम जिल्हयातील मौजे धुमका येथे पुरविण्यात आलेल्या पोषण आहाराच्या बंद पाकीटात मृत बेडूक आढळून आल्याची तक्रार पंचायत समिती सभापती यांच्याकडे, तसेच गोंडखेड (ता.जामनेर, जि.जळगाव) येथील अंगणवाडीत दिलेल्या खिचडीत मृत अळ्या आढळून आल्याची तक्रार गट विकास अधिकारी यांच्याकडे दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषी व्यक्तींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असुन त्यानुसार कारवाई करण्यात आलेली आहे

i) सदर प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने मौजे धुमका, ता.जि.वाशिम येथे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक), जिल्हा परिषद, वाशिम यांनी भेट देवुन संबधितांचे जबाब नोंदवुन चौकशी केली आहे

तसेच तक्रारदाराने जिल्हा परिषद, वाशिम कार्यालयात सादर केलेले शिरा पाककृतीचे पाकीट (फोडलेले व वापरलेले) मृत बेडुकासह उर्वरित शिरा व त्याच अंगणवाडीतील बॅच क्र.SHIR-M-EO९ दि. ०७.०९.२०१६ चे इतर दोन शिरा पाककृतीचे पाकीट जिल्हा परिषद, वाशिम कार्यालय पत्र क्र.८३५ दि. २९.९.२०१६ अन्वये तपासणीकरीता दिल्ली येथील Avon Food Laboratory (Pvt) Ltd, C-३५/२३ Lawrenc Road, Industrial area, Delhi या प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आलेले आहे. सदर प्रयोगशाळेकडून प्राप्त अहवालानुसार THR आहार आयसीडीएस च्या आहाराचे मानकानुसार असल्याचे व कोणत्याही प्रकारचे आक्षेपार्ह मटेरियल आढळून आलेले नाही.

ii) गोंडखेड ता.जामनेर जि.जळगांव येथील अंगणवाडीत दिलेल्या खिचडीत मृत अळ्या आढळून आल्याची तक्रार दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास गटविकास अधिकारी यांच्याकडे करण्यात आली. त्यानुसार बाल विकास प्रकल्प अधिकारी, जामनेर-२ यांनी चौकशी करुन अहवाल पत्र दिनांक ०१.१०.२०१६ रोजी सादर केलेला असून त्यात दिनांक २८.०९.२०१६ रोजी अंगणवाडीचे खिचडीत एक मृत अळी वरुन अनावधानाने पडल्याचे निदर्शनास आले आहे व खबरदारीची उपाय म्हणून सदर अंगणवाडी केंद्राला गरम ताजा आहाराचा पुरवठा करणारे महालक्ष्मी महिला बचतगट यांचेकडून गरम ताजा आहार पुरवठ्याचा आदेश दिनांक ०१.१०.२०१६ च्या आदेशान्वये रद्द केलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे व ठाणे येथील प्रादेशिक मनोरुग्णालयामधील महिला रुग्णांची स्थिती अत्यंत दयनिय असल्याबाबत**

**(१३) * ६६३८८ श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महिला आयोग आणि नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ मेंटल हेल्थ अँड न्यूरोसायन्सेस या संस्थांनी सन २०१५-१६ मध्ये देशभरातील निवडक दहा शासकिय मनोरुग्णालयांचा सविस्तर अभ्यास करुन महिला मनोरुग्णालयांच्या परिस्थितीवर एक अहवाल तयार करुन, सर्व राज्यांच्या आरोग्य सचिव तसेच प्रमुख आरोग्य अधिकाऱ्यांच्या दिल्ली येथे झालेल्या परिषदेत अहवाल तसेच उपाययोजनांची माहिती माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालात महाराष्ट्रातील येरवडा, पुणे व ठाणे मनोरुग्णालयामधील महिला रुग्णांची स्थिती अत्यंत गंभीर असल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालाचे व माहितीचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

येरवडा, पुणे येथील प्रादेशिक मनोरुग्णालयाची राष्ट्रीय महिला आयोगाने सविस्तर पाहणी केली आहे. तसेच सदर रुग्णालयातील रुग्णांसाठी काही उपाययोजना व सुधारणा सुचविल्या आहेत. तथापि, तेथील महिला रुग्णांची स्थिती गंभीर असल्याबाबत राष्ट्रीय महिला आयोगाच्या पत्रात नमूद करण्यात आलेले नाही.

(३) पुणे येथील प्रादेशिक मनोरुग्णालयाबाबत राष्ट्रीय महिला आयोगाने दिलेल्या पत्रात, कर्मचा-यांची उपलब्धता व प्रशिक्षण, इमारतीची दुरावस्था, प्राथमिक सोयी सुविधा, कर्मचारी प्रशिक्षण,नातेवाईकांना पत्र लिहिणे, सॅनेटरी नॅपकीन उपलब्ध करुन देणे,प्रत्येकाला गणवेशाऐवजी वेगवेगळे कपडे देणे,रुग्णालयाला स्वायत्तता,रुग्णांना औषधोपचाराची माहिती देणे इ. बाबी नमूद करण्यात आल्या आहेत.

(४) प्रादेशिक मनोरुग्णालय पुणे व ठाणे येथील रिक्त पदे भरणे, तसेच इमारतीच्या बांधकामाबाबतची कार्यवाही प्रगती पथावर आहे. सदर मनोरुग्णालयात स्त्री रुग्णांना त्यांच्या आवश्यकतेनुसार आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करुन देणे, रुग्णांच्या मनोरंजनाची व्यवस्था करणे, विविध सण साजरे करणे, मनोरुग्णालयातील अधिकारी कर्मचारी यांचे प्रशिक्षण घेणे, व्यावसायिक प्रशिक्षणाच्या माध्यमातून रुग्णांचे पुनर्वसन करणे इ. बाबी पार पाडल्या जातात. सदर रुग्णालयात व्यवसाय उपचार केंद्राच्या माध्यमातून, महिला व्यवसायोपचार तज्ञांच्या मदतीने महिला रुग्णांकडून विविध कलाकौशल्याचे साहित्य तयार करुन घेणे त्याची विक्री करणे या प्रक्रियाही पार पाडल्या जातात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयामधील अतिदक्षता विभागाची झालेली दुरवस्था

**(१४) * ६९२५३ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडीकल) मधील अतिदक्षता विभागामध्ये २६ खाटांची क्षमता असून त्यात अतिदक्षता व दक्षता असे दोन विभाग तयार करण्यात आले आहेत. त्यामध्ये अतिदक्षता विभागातील वातानुकूलित यंत्रणासह ५ खाटांची सोय तर दुसऱ्या दक्षता विभागात २१ खाटांची सोय करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अतिदक्षता विभागाची वातानुकूलित यंत्रणा मागील काही महिन्यांपासून योग्य पध्दतीने काम करीत नसल्यामुळे खिडक्या उघडया ठेवाव्या लागत असून, या अतिदक्षता विभागाला लागूनच असलेल्या मोकळया जागेत पडलेला टाकाऊ केरकचरा, वाढलेली झुडुपे व पावसाळयात नाल्यात साचून राहिलेले पाणी, या अस्वच्छतेमुळे रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण झाल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अतिदक्षता विभागाचे कामकाज योग्य पध्दतीने व सुरळीतरित्या होण्याकरिता वैद्यकीय प्रशासनाद्वारे कोणती उपाययोजना करण्यात आली व त्याचे स्वरुप काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील अतिदक्षता विभागातील वातानुकूलन यंत्रणा सुस्थितीत सुरू आहे. तसेच, अतिदक्षता विभागाला लागून असलेली मोकळी जागा स्वच्छ करणे, वाढलेली झुडपे व पावसाळ्यात नाल्यात साचलेले पाणी काढून टाकणे इत्यादी स्वच्छता विषयक कामे संस्थेकडून वेळीच करण्यात येतात. तसेच, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूरमध्ये पंतप्रधान स्वास्थ्य सुरक्षा योजनेंतर्गत नवीन ३ आय.सी.सी.यु.च्या स्वतंत्र इमारतीचे बांधकाम सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेकापूर (जि.बुलढाणा) वनपरिक्षेत्रातील जामठी बिटमधील तेली खोरे जंगलात दोन बिबट्यांचा झालेला मृत्यू

**(१५) * ६८१०२ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेकापूर (जि.बुलढाणा) वनपरिक्षेत्रातील जामठी बिटमधील तेली खोरे जंगलात शेतकऱ्यांनी वन्यप्राण्यापासून शेतातील पिकांचे संरक्षण करण्यासाठी केलेल्या तारेच्या कुंपणात विद्युत प्रवाह सोडल्याने दोन बिबट्यांचा मृत्यू झाला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन बिबट्यांच्या मृत्यूस जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे, बुलढाणा वनपरिक्षेत्रात दिनांक ३०.०७.२०१६ रोजी मौजे शेकापुर शिवारात जामठी नियतक्षेत्रातील वनखंड क्रमांक ३४५ मध्ये शेतीला लागून असलेल्या तार कुंपणातील विद्युत प्रवाहामुळे २ बिबट मृत झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले आहे.

(२) सदर प्रकरणी वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम ९,५०,५१(१), ३९, ५२ तसेच भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम २६(१) (डी), (आय) व महाराष्ट्र वन नियमावली २०१४ चे नियम ०९ अन्वये गुन्हा क्रमांक ५२८/२५, दिनांक ३०.०७.२०१६ नोंदविण्यात आला. या गुन्हा प्रकरणी श्री. साहेबराव शंकर थोरात, वय ६५ वर्षे, श्री. रमेश रामा रावळकर, वय-४० वर्षे, श्री. दिपक गजुबा रावळकर, वय-२७ वर्षे व श्री. उमेश ग्यानदेव दांडगे, वय-३४ वर्षे सर्व रा. जामठी, ता.जि. बुलडाणा या ४ इसमांविरुध्द मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, बुलडाणा यांचे न्यायालयात आर.सी.सी. क्रमांक १७९/२०१६, दिनांक ०४.१०.२०१६ अन्वये फिर्याद दाखल करण्यात आली आहे. याव्यतिरीक्त श्री. निखिल संजय गरुड, वय-१७ वर्षे यांचेविरुध्द मा.मुख्य न्यायदंडाधिकारी तथा बाल न्यायमंडळ, बुलडाणा यांचे न्यायालयात जे.सी.सी. क्रमांक १६३/१६, दिनांक २१.११.२०१६ अन्वये फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे वडद व तळवली (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील पाझर तलावांच्या कामांना विलंब होत असल्याबाबत**

**(१६) * ६५२३१ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वडद व तळवली (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील पाझर तलाव नादुरूस्त असल्यामुळे या गावांमध्ये उन्हाळयाच्या दिवसांत तीव्र पाणीटंचाई असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे वडद तलावाचे नव्याने बांधकाम करण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही विभागीय स्तरावर प्रगतीत असून, मौजे तळवली येथील पाझर तलावाच्या प्रकल्पावरील वाढीव खर्चासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे अशंत: खरे आहे,

मौजे वडद ता. गुहागर, जिल्हा रत्नागिरी येथील पाझर तलाव नादुरुस्त आहे.

मौजे तळवली ता. गुहागर, जिल्हा रत्नागिरी येथील पाझर तलावाचे काम महाराष्ट्र जलसंधारण महामंडळामार्फत प्रगतीपथावर असून ८० टक्के काम पूर्ण झालेले आहे.

(२) होय.

(३) या दोन्ही योजनांच्या अंदाजपत्रकावर क्षेत्रिय स्तरावरील यंत्रणेमार्फत तपासणी करण्यात येत असून प्रस्ताव अद्याप विभागास प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील अजिंठा डोंगररांगांना तारेचे कुंपण करण्याबाबत

**(१७) * ७०९५८ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील अजिंठा डोंगररांगाच्या परिसरातील वन्यप्राण्यांमुळे पिकांचे नुकसान तसेच शेतकऱ्यांवर वाघाचा हल्ला झाल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून येथील शेतकऱ्यांना वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या पिकांची नुकसान भरपाई देण्याबाबत व येथील डोंगररांगाना तारेचे कुंपण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यात सन २०१६-१७ (ऑक्टोंबर, २०१६ पर्यत) रानडुक्कर, निलगाय, काळविट इत्यादी वन्यप्राण्यांपसून शेतपिकांच्या नुकसानीची ३२४ प्रकरणे निदर्शनास आली असून प्रचलित शासन निर्णयानुसार संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास रु.६,४६,९००/- नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

तथापि शेतकऱ्यांवर वाघाचा हल्ला झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

सिल्लोड तालुक्यातील अजिंठा डोंगररांगांच्या परिसरातील बहुतेक वनक्षेत्र डोंगराळ असल्याने सदर क्षेत्रास कुंपन करणे वन्यजीवांचे सुरक्षेच्या दृष्टीने योग्य होणार नाही. तथापि वन्यप्राण्यांपासून शेतपिकांचे नुकसान टाळण्यासाठी क्षेत्रिय स्तरावर वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येतात.

-----------------

## 'मनोधैर्य' योजनेतील पिडीतांना अर्थसहाय्य मिळाले नसल्याबाबत

**(१८) * ६७९१६ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली),**

**श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बलात्कार किंवा ॲसिड हल्ल्यातील पीडीतांना आर्थिक सहाय्य करुन आधार देण्यासाठी माहे ऑक्टोबर, २०१३ मध्ये 'मनोधैर्य' योजना सुरु करण्यात आली असून या योजनेतील निम्म्यांहून अधिक पिडीतांना प्रत्यक्ष अर्थसहाय्य मिळाले नसल्याची माहिती माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेकरीता १२० कोटी रुपयांची तरतूद करणे अपेक्षित असताना निधी अभावी ९२८ अत्याचार पिडीत मुली या योजनेपासून दोन वर्षांपासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पिडीत मुलींना सदर योजनेंतर्गत आर्थिक सहाय्य देण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय.

(३) सप्टेंबर २०१६ अखेर एकूण सर्व प्रलंबित प्रकरणांसाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात उपलब्ध मूळ तरतुदीच्या व्यतिरिक्त रु.२७,६६,३३,०००/- इतकी तरतूद आकस्मिकता निधी अग्रीमाद्वारे उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे सलगरे (ता.मिरज, जि.सांगली) येथील गायरान जमिनीवरील अनधिकृत बांधकामांबाबत

**(१९) * ६९७०४ डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (मिरज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सलगरे (ता.मिरज, जि.सांगली) येथील गट नं ३४३ या जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर "महाराष्ट्र सरकार सरकारी गायरान" अशी नोंद असतानाही उपसरपंच आणि ग्रामसेवक यांनी अधिकाराचा गैरवापर करून अनधिकृत बांधकामे केल्याबाबतची तक्रार ग्रामस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलल्या तक्रारीच्या चौकशीअंती सबंधितांविरूध्द तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत दिनांक ३० जुलै, २०१६ व ९ ऑगस्ट, २०१६ रोजी गटविकास अधिकारी, मिरज यांना कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी आदेश देवूनही सबंधितांविरुध्द अद्याप गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(५) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय. हे खरे आहे.
(२) संबंधित तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करून अतिक्रमण झाल्याचे सिद्ध झाल्यास अतिक्रमण तात्काळ निष्कासित करुन संबंधितांविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे दिनांक ३० जुलै, २०१६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी निर्देश दिले आहेत.

त्याचप्रमाणे ग्रामपंचायतीस मार्गदर्शन करून व अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून सदर अतिक्रमण निष्कासित करण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी त्यांच्या दिनांक ०८/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मिरज यांना निर्देश दिले आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी दिलेल्या निर्देशानुसार दिनांक १०/०८/२०१६ रोजी सदर अतिक्रमण निष्कासित करण्यात आले आहे. बेकायदेशीर बांधकाम करणा-यावर कायदेशीर कारवाई करणेबाबत ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत सलगरे,ता. मिरज यांनी पोलीस स्टेशन कवठेमहांकाळ येथे फिर्याद दाखल केली होती. त्या अनुषंगाने FIR No. ०४२८ नुसार भारतीय दंड विधान संहिता, कलम ४४७, ३४, सह महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ५३ (२) नुसार गुन्हा नोंद करणेत आलेला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हा परिषदेच्या अंगणवाड्यांसाठीच्या कपाट खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(२०) * ६६६३० श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या अंगणवाडयांना कपाट खरेदी करण्यासाठी प्रत्येकी ५ हजार रुपये थेट त्यांच्या खात्यात जमा करुन अंगणवाडी सेविकांनी स्वत: कपाट खरेदी करण्याच्या सूचना देण्यात आल्या असतांना जिल्हा परिषदेच्या काही अधिकारी व पदाधिकाऱ्यांनी जिल्हयातील अनेक अंगणवाडयांना निकृष्ट कपाटे खरेदी करुन कपाट खरेदीत गैरव्यवहार केल्याची माहिती दिनांक ६ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार कपाट खरेदीत गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही, हे खरे नाही.

(२), (३) व (४) अहमदनगर जिल्हयातील अंगणवाडयांमधील कपाट खरेदीबाबत, जिल्हा परिषदेने केलेल्या ठरावानुसार, चौकशी समिती नियुक्त करुन चौकशी करण्यात आलेली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी याबाबत आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचेकडे सादर केलेल्या अहवालावर त्रुटीपुर्तता अहवाल मागविण्यात आलेला असून सदर अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडून प्राप्त झाल्यावर याप्रकरणी आवश्यक असल्यास, संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन पुढील आवश्यक कारवाई करण्यात येईल.

-----------------

**पुणे जिल्हा रुग्णालयात ऑक्सिजन यंत्रणेचा**
**वापर होत नसल्याबाबत**

**(२१) * ७१०५४ श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील औंध जिल्हा रुग्णालयातील ऑक्सिजन यंत्रणेचा वापर मागील ३ वर्षांपासून होत नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णालयातील रुग्णांना खाजगी रुग्णालयात जाऊन वैद्यकीय उपचार घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, औंध जिल्हा रुग्णालयात ऑक्सिजन यंत्रणेसह अन्य अद्ययावत सोयीसुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) जिल्हा रुग्णालयातील सर्व वार्डात रुग्णांना ऑक्सिजन पुरवण्याकरिता सिलेंडरने ऑक्सिजन पुरवण्याची सोय उपलब्ध आहे. SNCU व ICU या दोन्ही वॉर्डात सेंट्रल ऑक्सिजन लाईनद्वारे रुग्णांना ऑक्सिजन पुरवण्याची यंत्रणा बसवलेली आहे. तसेच गरज भासल्यास ऑक्सिजन सिलेंडरद्वारे रुग्णांना ऑक्सिजनचा पुरवठा केला जातो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात एमबीबीएस आणि बीडीएस या वैद्यकीय अभ्यासक्रमांकरिता**
**नीट परीक्षा देणे अनिवार्य करण्यात आल्याबाबत**

**(२२) * ६९८६३ श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एमबीबीएस आणि बीडीएस या वैद्यकीय अभ्यासक्रमांकरिता नीट परीक्षा देणे अनिवार्य करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, फिजिओथेरपी, स्पीच थेरपी आदी इतर वैद्यकीय अभ्यासक्रमांचे प्रवेश कोणत्या प्रवेश परीक्षेच्या आधारे होणार हे वैद्यकिय शिक्षण विभागाने निश्चित केले नसल्याचे माहे ऑगस्ट २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आयुर्वेदिक, होमिओपॅथिक औषधनिर्माण शास्त्राचे सन २०१७ च्या शैक्षणिक वर्षात प्रवेशांबाबत स्वतंत्र सीईटीद्वारे होणार किंवा कसे याबाबत निर्णय घेऊन शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमाप्रमाणेच वगळता उर्वरित आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाचे प्रवेश सन २०१७ करिता नीटद्वारे करण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

तसेच, औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाचे सन २०१७ चे प्रवेश हे राज्याच्या सामाईक प्रवेश परीक्षेद्वारे (CET) करण्यात येणार आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यात घाटबोरी परिक्षेत्रांतर्गतील सागवान वृक्ष तोडण्यात आल्याबाबत

**(२३) * ६५५०५ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यात घाटबोरी परिक्षेत्रांतर्गत विना परवाना दिनांक ९ जून, ते ११ जून २०१६ रोजीच्या दरम्यान घाटबोरी, वाघदेव, नागेशवाडी बीटमधील १०० ते १२० गोलाईची सुमारे ७० सागवान वृक्ष तोडण्यात आल्या प्रकरणी संबधित अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.वने मंत्री याच्याकडे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे

(२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधींच्या निवेदनाच्या अनुषंगाने उपवनसंरक्षक बुलढाणा यांचेमार्फ़त चौकशी करण्यात आली. सदर प्रकरणातील आरोपी आढळून आलेले नाहीत. तथापि, ज्या वनकर्मचा-यांनी वनसंरक्षणाच्या कामात पुरेशी दक्षता घेतलेली नाही अशा वनपरिक्षेत्र अधिकारी, घाटबोरी, संबंधित वनपाल तसेच संबंधित वनरक्षक यांच्याकडून दिनांक १५.१०.२०१६ चे आदेशान्वये रु.२५,२७२/- इतकी नुकसान भरपाई वसूल करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच श्री.के.बी.देशमुख, घाटबोरी-२, वनरक्षक यांची एक वार्षिक वेतनवाढ देखील तात्पुरत्या स्वरुपात रोखण्यात आली आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## मिरज (जि. सांगली) शासकीय वैद्यकिय महाविद्यालयामधील डायलिसिस मशीन बंद असल्याबाबत

**(२४) * ७००७७ श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरज (जि. सांगली) शासकीय वैद्यकिय महाविद्यालयामधील डायलिसिस मशीन बंद असल्याचे माहे सप्टेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे रुग्णांना वेळेत डायलिसिस होऊ शकत नाही तसेच अनेक रुग्णांना बाहेरील खाजगी रुग्णालयात जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त महाविद्यालयामध्ये डायलिसिस करीता रुग्णांची प्रचंड गर्दी होत असल्याने पद्मभूषण वसंतदादा रुग्णालय, सांगली या रुग्णालयामध्ये देखील नवीन डायलिसिस मशीन खरेदी करुन ही सुविधा शासन सुरु करणार आहे काय,

(४) असल्यास, शासनाने यासंदर्भात काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

संस्थेमध्ये उपलब्ध असलेल्या ४ पैकी २ डायलिसिस मशीन बंद होत्या. संस्थेस सन २०१५-१६ मध्ये २ नविन यंत्रे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.
(२) हे खरे नाही.

संस्थेत उपलब्ध ०२ यंत्रांच्या सहाय्याने रुग्णांवर डायलिसिस उपचार करण्यात येत होते.
(३) व (४) वित्तिय वर्ष २०१६-१७ मध्ये ०२ नविन डायलिसीस यंत्रे खरेदी करण्यासाठी निधी मंजूर करण्यात आला असून त्यास प्रशासकीय मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयातील मुठा नदीवरील टेमघर धरणाच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार

**(२५) * ६५३५७ अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील मुठा नदीवर बांधण्यात आलेल्या टेमघर धरणाच्या निकृष्ट दर्जाच्या बांधकामाच्या गैरव्यवहाराबाबत नेमण्यात आलेल्या निवृत्त सचिव रानडे यांच्या एकसदस्यीय चौकशी समितीने दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने सदोष बांधकामास जबाबदार असणा-या श्रीनिवास व प्रोग्रेसिव्ह कन्स्ट्रक्शन या दोन ठेकेदार कंपन्यांच्या संचालकासह ९ कंत्राटदार व २५ अभियंत्यांविरुध्द गुन्हे दाखल करणार असल्याची माहिती मा.जलसंपदा मंत्री यांनी दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या टेमघर धरणातून मोठ्या प्रमाणात पाणीगळती सुरु असल्याने धरणाची सुरक्षा धोक्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टेमघर धरणाच्या सुरक्षिततेच्या संदर्भात व शासनाची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणा-या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) काही अंशी खरे आहे.

धरण पुर्ण क्षमतेने भरलेले असतानाच तीव्र स्वरुपाचा भूकंप झालेस धरणाचे सांडव्याचे मोनोलिथ क्र. ०९ ते २० मधील पायाच्या बांधकामात विहीत मर्यादेपेक्षा काही प्रमाणात जास्त ताण निर्माण होऊ शकतो असे अभ्यासातून दिसुन येते. सारांशाने धरण फुटण्यासारखी परिस्थिती नसली तरीही धरण मजबूती करणाबाबत तातडीच्या उपाय योजना करणे आवश्यक आहे.

(३) दोषी अधिकाऱ्यांवर विभागांतर्गत चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच पौड, पोलिस स्टेशन, ता. मुळशी येथे दिनांक १८/०८/२०१६ रोजी संबंधित अभियंते व कंत्राटदार यांच्या विरुध्द F.I.R क्र. २१४/२०१६ नुसार F.I.R दाखल करण्यात आला आहे. तसेच शासन आदेश क्र.संकिर्ण-२०१६/८११/ (१८६/२०१६)/ दक्षता-१, दि. ०३/०९/२०१६ अन्वये संबंधित अभियंता यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे संबंधित कंत्राटदारास काळ्या यादीत टाकण्याबाबत कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईच्या पूर्व उपनगरातील मानखुर्द येथील 'द चिल्डेन्स एड सोसायटी' च्या बालगृहात महिलेसह मतीमंद मुलांचा झालेला मृत्यू

**(२६) * ६५११३ श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), ॲड.यशोमती ठाकूर**

**(तिवसा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या पूर्व उपनगरातील मानखुर्द येथील 'द चिल्डेन्स एड सोसायटी' च्या बालगृहात माहे ऑगस्ट व सप्टेंबर या २ महिन्यांच्या कालावधीत १ महिलेसह इतर ५ मतीमंद मुलांचा मृत्यू झाल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बालगृहात २८५ मुले असून त्यात १२५ मुलींचा समावेश आहे, या मुली व मुलांच्या निवासाच्या जागेत पाण्याची सततची गळती, गलिच्छ स्वच्छतागृहामुळे फैलावलेले आजार व अपुऱ्या औषधोपचारामुळे या मुलांचा मृत्यू झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून याप्रकरणी चौकशी करण्याच्या मागणीचे निवेदन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष यांनी मा.मुख्यमंत्री, मा.महिला व बाल कल्याण मंत्री यांना माहे ऑक्टोबर, २०१६ च्या पहिल्या आठवडयात दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली व महिला बाल विकास मंत्री उपाध्यक्ष असलेली गव्हर्निंग कमिटी सन २०१५ पासून स्थापन करण्यात आलेली नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकाराची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत व बालगृहातील मृत्यू रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध रुग्णालयांमध्ये उपचारासाठी दाखल असतांना १ महिलेसह इतर ५ मतीमंद मुलांचा मृत्यू झालेला आहे.

(२) सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई उपनगर यांनी पाठविलेल्या मृत्युबाबतच्या अहवालाप्रमाणे चौकशी करण्याकरीता आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी आयुक्तालयातील अधिकाऱ्यांची चौकशी समिती नेमली आहे.

(३) नाही.

(४) सदर घटनेची चौकशी करण्यासाठी आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी आयुक्तालयातील अधिकाऱ्यांची चौकशी समिती नेमलेली आहे.

(५) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी गठीत केलेल्या चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर त्याप्रमाणे दोषींवर कारवाई करण्यात येईल. तसेच मतिमंद बालगृहातील मृत्यु रोखण्यासाठी दि. २५.१०.२०१६ रोजी मा.मंत्री (सा.न्या.) यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन योग्य त्या उपाययोजना करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात जलयुक्त शिवार योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(२७) * ७२१७६ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात नांदगांव, वरस्कोल वांद्रे, माल, शिरगाव, वाशाळा, साकडबाव, कोठारे, आंबेखोर, वेळूक, कुडशेत, टेंभे, मानेखिंड यांच्यासह एकूण २० गावांसाठी राबविण्यात आलेल्या जलयुक्त शिवारांच्या एकूण ११०८ कामांमध्ये उपविभागीय अधिकारी-शहापूर, गटविकास अधिकारी, तहसिलदार-शहापूर तालुका, सचिव कृषी अधिकारी यांनी मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार केल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहापूर तालुक्यातील या गावांमध्ये जलयुक्त शिवार योजना राबविण्यात आल्या नंतरही येथे पाणी साठवण क्षमता व पाण्याची क्षमता यांमध्ये कोणतीही प्रगती झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार जलयुक्त शिवार योजनेतील कामांमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) खरे नाही.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१५-१६ मध्ये शहापूर तालुक्यातील १३ गावांची निवड करण्यात आली आहे. सदर गावात १०५२ कामे प्रस्तावित करण्यात आली होती, त्यापैकी माहे ऑक्टोबर, २०१६ अखेर १०२७ कामे पूर्ण करण्यात आली असून ७ कामे प्रगतीपथावर आहेत. सदर कामांमुळे २१३४ टी.सी.एम. पाणीसाठा क्षमता निर्माण झाला आहे.

भूजल सर्वेक्षण विभागाच्या मूल्यमापन अहवालानूसार शहापूर तालुक्यात सन २०१६ च्या माहे जानेवारी व मार्च मध्ये भूजल पातळीत वाढ झाली आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्हा परिषदेला विविध प्रकारच्या बांधकामांसाठी मिळालेल्या निधीबाबत**

**(२८) * ७०७९२ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा परिषदेला सन २०१५-१६ अंतर्गत एकूण विविध प्रकारची बांधकामे, रस्ते व मोऱ्यांची बांधकामे करण्यासाठी ११४ कोटी ७९ लाख निधी प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त निधीपैकी आतापर्यंत फक्त ३८ कोटी ६३ लाखांचाच खर्च झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा परिषद अंतर्गत विविध प्रकारच्या २८८८ कामांपैकी ८५५ कामे पूर्ण झाली असून २०३३ कामे अपूर्ण असून ही सर्व कामे आदिवासी विभागातील आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत व उपरोक्त निधी वर्षाअखेर पूर्ण खर्च करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाशिक जिल्हा परिषदेला सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात रु.१९१ कोटी ६७ लक्ष ६८ हजार इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.
(२) ऑक्टोबर २०१६ अखेर प्राप्त निधी पैकी रु.८२ कोटी ३४ लक्ष २४ हजार निधी खर्च करण्यात आलेला आहे.
(३) नाशिक जिल्हा परिषदअंतर्गत विविध प्रकारच्या एकूण ४१७६ कामांपैकी १७५४ कामे पूर्ण झालेली असून २४२२ कामे प्रगतीत आहेत. ही कामे आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्रातील आहेत.
(४) सन २०१५-१६ मधील अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी तसेच अखर्चित निधी सन २०१६-१७ अखेर खर्च करण्यास शासनाची अनुमती आहे. माहे मार्च, २०१७ अखेर सर्व कामे पूर्ण करण्यात येतील.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयात हृदयविकाराचे निदान झालेल्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील बालकांच्या शस्त्रक्रिया रखडल्याबाबत

**(२९) * ६७३०७ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयात हृदयविकाराचे निदान झालेल्या आर्थिकदृष्टय़ा दुर्बल घटकातील ४८ बालकांच्या शस्त्रक्रिया रखडल्या असून पिंपरी- चिंचवडमधील एका दीड वर्षांच्या मुलीचा तीन महिन्यांपूर्वी उपचारांअभावी मृत्यू झाला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमात सदरहू निदान झालेल्यांपैकी २० बालकांच्या शस्त्रक्रिया केवळ कागदपत्रे अपुरी असल्यामुळे राहिल्या असून इतर बालकांच्या शस्त्रक्रिया अतिजोखमीच्या असल्याची गंभीर बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या बालकांच्या तातडीने शस्त्रक्रिया करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) पुणे जिल्हयात हृदयविकार असलेल्या ४८ बालकांच्या शस्त्रक्रिया रखडल्या नसून, त्यातील १४ बालकांच्या शस्त्रक्रिया झालेल्या आहेत तर ३४ बालकांच्या शस्त्रक्रिया विविध कारणामुळे सध्या प्रलंबित आहेत.

पिंपरी-चिंचवड मधील या दीड वर्षाच्या मुलीचा हृदयरोग संबंधीच्या सर्व तपासण्या करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये Large VSD with severe pulmonary hypertension असे गंभीर स्वरुपाचे निदान डॉक्टरांनी करुन सदरील हृदय शस्त्रक्रिया अतिजोखमीची असल्याचे मत दिले. त्यामुळे सदर रुग्णांची शस्त्रक्रिया प्रलंबित होती. परंतु या रुग्णावर रुग्णालयात उपचार सुरु होते. मात्र उपचार सुरु असताना त्या मुलीचा मृत्यू झाला.
(२) हे खरे नाही.

हृदयविकाराचे निदान झालेल्या बालकांपैकी कागदपत्रे अपूरी असल्यामुळे एकूण २ बालकांची शस्त्रक्रिया प्रलंबित आहे. तर हृदयरोग तज्ञांच्या सल्ल्यानुसार अतिजोखमीची शस्त्रक्रिया असलेले एकूण ७ बालके आहेत.
(३) कागदपत्रे अपूर्ण असलेल्या दोन बालकांची शस्त्रक्रिया डिसेंबर, २०१६ मध्ये नियोजित आहे. तर अतिजोखमीच्या ७ बालकांवर हृदयशस्त्रक्रिया करणे धोक्याचे असल्याचे हृदयरोगतज्ञांचे मत असल्यामुळे सद्या त्या शस्त्रक्रिया प्रलंबित आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हयातील आंबेघर (ता.पेण) व कुडकी (ता.श्रीवर्धन) धरणांची झालेली दुरवस्था

**(३०) * ६५९८२ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धरणांच्या सुरक्षिततेच्या पार्श्वभूमीवर राज्यातील धोकादायक धरणांचा अभ्यास करण्यात आला असता रायगड जिल्हयातील पेण तालुक्यातील आंबेघर व श्रीवर्धन तालुक्यातील कुडकी या दोन धरणांचा राज्यातील सर्वाधिक धोकादायक धरणांच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन्ही धरणांची देखभालीअभावी दुरवस्था झाल्यामुळे धरणांमध्ये एकूण साठवण क्षमतेपेक्षा कमी पाणीसाठा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आंबेघर व कुडकी या धरणांच्या दुरूस्तीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशतः खरे आहे

रायगड जिल्हयातील पेण तालुक्यातील आंबेघर ल.पा. प्रकल्प (वर्ग-२) च्या धरणात संवर्ग-१ ची त्रुटी आहे. मात्र श्रीवर्धन तालुक्यातील कुडकील. पा. प्रकल्प (वर्ग-२) चे धरण हे राज्यातील सर्वाधिक धोकादायक धरणांच्या यादीमध्ये समाविष्ट नाही.

(२) अंशतः खरे आहे.

आंबेघर धरणामध्ये सन २०१५-१६ पर्यंत पूर्ण क्षमतेने पाणी साठा होत होता. परंतु धरणाच्या विमोचकाची दुरुस्ती करण्याच्या उद्देशाने सन २०१६-१७ मध्ये दुरूस्ती करीता धरण पूर्णपणे रिकामे ठेवण्यात आले आहे.

कुडकी धरणाची दुरुस्ती जून-२०१४ मध्ये पूर्ण झालेली असून, धरणामध्ये सन २०१६-१७ च्या हंगामामध्ये १०० टक्के पाणी साठा झालेला आहे.

(३) शासनाने दि.१७.११.२०१६ च्या निर्णयानुसार सिंचन व्यवस्थापनाचे काम अधिनियमातील तरतूदीनुसार कोकण पाटबंधारे विकास महामंडळाकडे वर्ग केलेले असून पाणी पट्टीची रक्कम महामंडळ स्तरावर दुरूस्तीच्या कामासाठी खर्च करण्यास परवानगी दिली आहे. त्यामधून सदरच्या कामाची दुरूस्ती करण्याचे नियोजन आहे.

कुडकी धरणाची दुरुस्ती जून-२०१४ मध्ये पूर्ण झालेली असून धरणास सकृत दर्शनी कोणत्याही प्रकारचा धोका नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील सरदार वल्लभभाई पटेल रुग्णालयात रुग्णांना मुदत संपलेली सलाईन लावल्याबाबत

**(३१) * ६७१३८ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील पुणे कॅन्टोमेंट बोर्डाच्या सरदार वल्लभभाई पटेल रुग्णालयात रुग्णांना मुदत संपलेली सलाईन लावण्याची बाब दिनांक २१ ऑगस्ट २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीसांच्या तपासामध्ये या रुग्णालयात १ हजार हून अधिक मुदत संपलेल्या सलाईनच्या बाटल्या आढळल्या असून अनेक दिवसांपासून अशा मुदत संपलेल्या सलाईन या रुग्णालयात वापरण्यात येत होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाबाबत संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) दि. २२ ऑगस्ट, २०१६ च्या दैनिक सकाळ, पुणे या वृत्तपत्रात या आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती.

(२) सदर बातमीच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासनाच्या अधिका-यांनी दि. २२/०८/२०१६ रोजी तपास व चौकशीसाठी सदर रूग्णालयाला भेट दिली. तपासणीदरम्यान लष्कर पोलीस ठाणे, पुणे शहर यांनी दि. २१/०८/२०१६ रोजी

सदर रूग्णालयातून मुदतबाहय झालेल्या सलाईनच्या २०५ बाटल्या जप्त केल्याचे निदर्शनास आले आहे. सदर रूग्णालयात अनेक दिवसापासून अशा मुदतबाहय सलाईन वापरण्यात येत असल्याचे तपासणी दरम्यान निदर्शनास आले नाही.
(३) अन्न व औषध प्रशासनाने सदर रूग्णालयास रूग्णास मुदत संपलेली सलाईन लावल्याबाबत त्यांचे विरूध्द कायद्यानुसार कारवाई का घेण्यात येऊ नये याबाबत स्पष्टीकरण मागविण्यासाठी कारणे दाखवा नोटिस बजावण्यात आली आहे.

रूग्णालयाच्या प्रशासनाकडून प्राप्त झालेले स्पष्टीकरण व अन्न व औषध प्रशासनाव्दारे करण्यात आलेल्या चौकशीत रूग्णालयातील ३ कर्मचारी दोषी असल्याचे निष्पन्न झाले आहे. रूग्णालयातील सदर तिन्ही कर्मचारी केंद्र शासनाच्या सेवेत असल्याने त्यांचे विरूध्द कायदेशीर कारवाई करण्यासाठी शासनाची मान्यता घेण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे कॅन्टोनमेंट बोर्ड, कॅम्प, पुणे-१ यांना प्रशासनाव्दारे कळविण्यात आले आहे. सदर मान्यता प्राप्त झाल्यावर त्या कर्मचाऱ्यांविरूध्द पुढील कारवाई करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात साथीचे रोग रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(३२) * ६५०९९ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अजित पवार (बारामती), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव),**

**श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबई, ठाणे, पुणे, सोलापूर, बुलढाणा, धुळे, कोल्हापूर, नाशिक इत्यादी ठिकाणी डेग्यू, मलेरिया, लेप्टो आणि चिकनगुनिया यासारख्या साथीच्या रोगांचा फैलाव मोठया प्रमाणात झाला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, या साथीच्या रोगांना प्रतिबंध करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत:  खरे आहे.

जानेवारी ते ऑक्टोबर २०१६ राज्यात नाशिक, ठाणे आणि पुणे विभागात डेंग्यू रुग्ण अनुक्रमे १६४१, १५६३ व १२०१ आढळले आहेत. बुलढाणा जिल्हयात डेंग्यू चे २ व हिवतापाचे ५९ रुग्ण आढळले आहेत, तर पुणे शहरात आणि ग्रामीण भागात अनुक्रमे १९४३ व २१७ एवढे चिकुनगुन्या रुग्ण आढळले आहेत. याच कालावधीत मुंबई मनपामध्ये लेप्टोचे २३० रुग्ण आढळून आले आहेत. मात्र राज्यभरात मलेरियाचे प्रमाण कमी होताना निदर्शनास आले आहे.

(२) राज्यातील साथरोग परिस्थितीचे नियमित स्वरुपात संनियंत्रण केले जाते. तसेच या संदर्भात महाराष्ट्र साथरोग प्रतिबंध व नियंत्रण तांत्रिक समितीची स्थापनाही करण्यात आली आहे. या समित्यांच्या वेळोवेळी बैठका घेण्यात येत असून यात साथरोगांचा आढावा व त्यावर उपाययोजना सूचविण्यात येत असतात.

(३) राज्यात साथरोगाचे प्रभावी प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी सर्व आवश्यक त्या उपाययोजना नियमितपणे राबविल्या जातात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हयात मंजूर असलेल्या १५१ अंगणवाडयांच्या इमारतींपैकी एकही इमारत पूर्ण नसल्याबाबत

**(३३) * ६६७२७ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयात मंजूर असणाऱ्या १५१ अंगणवाडया इमारतीपैकी एकही इमारत पूर्ण नसल्याचे नुकतेच माहे सप्टेबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अंगणवाडया इमारत बांधकामाच्या प्राप्त निधीपैकी ७ कोटी २५ लाख २८ हजार रुपयांचा निधी शासनाकडे शिल्लक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अंगणवाड्यांच्या इमारतींचे बांधकाम पूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रलंबित निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

रायगड जिल्हयामध्ये विविध योजनांतर्गत मंजूर एकूण १४१ अंगणवाडयांपैकी ४ अंगणवाडयांच्या इमारतींची बांधकामे पूर्ण झालेली असून ४१ इमारतींची बांधकामे ई-निविदा स्तरावर, १५ इमारतींची बांधकामे प्रत्यक्षात सुरु व ८ अंगणवाडयांना कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. ५ अंगणवाडयांच्या जागेबाबत वाद असून उर्वरित ६८ अंगणवाडी बांधकामाची कार्यवाही गट स्तरावर सुरु आहे.

(२) व (३) उपरोक्त १४१ अंगणवाडयांच्या बांधकामाकरिता लागणारा रु.८ कोटी ४६ लाख इतका निधी विविध योजनांतर्गत मंजूर व उपलब्ध असून त्यापैकी रु.२४ लाख इतका निधी प्रत्यक्षात खर्च झालेला आहे. उर्वरित निधी खर्च करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील ग्रामीण जिल्हा रुग्णालयाचे रुपांतर उपजिल्हा रुग्णालयात करण्याबाबत

**(३४) * ६६५३२ श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाचे रुपांतर उपजिल्हा रुग्णालयात करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री व जिल्हा शल्यचिकित्सक अहमदनगर यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १५ नोव्हेंबर २०१५ रोजी वा त्यासुमारास तसेच तद्नुसार वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तालुक्यातील आदिवासी रुग्णांची असलेली संख्या विचारात घेता अकोले येथील ग्रामीण रुग्णालयाचे रुपांतर उपजिल्हा रुग्णालयात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) शासनस्तरावर सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत जोड बृहत आराखडा करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर मागणी जोड बृहत आराखडा अंतिम करताना निकषानुसार विचारात घेतली जाईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**"कोथळी तिर्थक्षेत्र" (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) या तिर्थक्षेत्राच्या विकासकामांना सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत**

**(३५) * ६७७२१ श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) "कोथळी तिर्थक्षेत्र" (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) या तिर्थक्षेत्राच्या विकासकामांना सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठीचा प्रस्ताव अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगाव यांनी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांच्याकडे पाठविला असून त्यावर अद्‌याप निर्णय न झाल्यामुळे विकासकामांवर परिणाम होत असल्याबाबत त्वरित निर्णय घेण्यासाठी तेथील लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे पत्राद्‌वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, या तिर्थक्षेत्राच्या विकास कामांना सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) श्रीसंत मुक्ताईनगर मंदिर, कोथळी, ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव, या "ब" वर्ग तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी विविध कामांसाठी एकूण रु.७.०४ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, जळगांव यांनी शासनास सादर केला होता. परंतु सदर प्रस्तावातील काही कामे

ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेच्या निकषानुसार नसल्याने फक्त भक्तनिवास व संरक्षण भिंत या कामाकरीता एकूण रु.१६२.०० लक्ष इतक्या निधीची प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती व त्यापैकी रु.८६.०० लक्ष इतका निधी जिल्हा परिषद, जळगांव यांना वितरीत करण्यात आला होता. तसेच सदर तीर्थक्षेत्राजवळील इतर विकास कामे सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगांव यांचेमार्फत करण्यात येत असल्याने, भक्तनिवास व संरक्षण भिंत या कामांचा निधी सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगांव यांना वर्ग करण्यात आला होता.

तद्नंतर, अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, जिल्हा जळगांव यांनी प्रस्तावातील इतर कामांनादेखील प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती करुन एकूण रु.९.९० कोटी इतक्या किंमतीचा सुधारीत आराखडा शासन मान्यतेसाठी सादर केला आहे. परंतु सदर कामे ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेच्या निकषानुसार नसल्याने व सदर योजनेअंतर्गत ग्रामीण तीर्थक्षेत्रांना निधी देण्याची मर्यादा रु.२.०० कोटी इतकीच असल्याने सदर कामांना सुधारीत प्रशासकीय मान्यता व निधी देणे शक्य होत नाही.

(३) सदर कामांना ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योनजेअंतर्गत सुधारीत प्रशासकीय मान्यता देणे शक्य नसल्याने, ग्रामीण तीर्थक्षेत्र विकासाबाबतचा नियोजन विभागाचा, शासन निर्णय, दिनांक ४ जुन २०१५ अन्वये सदर प्रस्ताव मा.पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समिती व जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समितीच्या मान्यतेने शासनास सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, जळगांव यांना कळविण्यात आले आहे. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यावर उच्चाधिकार समिती व शिखर समितीच्या मान्यतेने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अकोला जिल्हा परिषदेतंर्गत सी.सी.टी.व्ही कॅमेरे खरेदीत झालेला गैरव्यवहार**

**(३६) * ६६८७२ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा परिषदेतंर्गत, जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०१५-२०१६ मध्ये नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत गैरमार्गाने सर्व पंचायत समित्यांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे खरेदी केल्याच्या असंख्य तक्रारी आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खरेदी प्रस्तावास दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१६ रोजी जिल्हा परिषद कडून प्रशासकीय मान्यता देऊन त्याच दिवशी सर्व पंचायत समितीस्तरावर निविदा सूचना काढल्या तसेच विशिष्ठ पुरवठादारांनाच निविदा सादर करण्याचे पत्र देखील देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी मा.मुख्यमंत्री यांच्या कार्यालयाकडून चौकशी करण्याचे आदेश राज्याचे मुख्य सचिव यांना देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

मा.विधानसभा सदस्य श्री.रणधीर सावरकर यांनी त्यांचे दिनांक १.८.२०१६ व १०.९.२०१६ चे पत्रान्वये या संदर्भात माहिती मागीतली आहे. तसेच काही वृत्तपत्रात सुध्दा बातम्या आलेल्या आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

दिनांक २५ जानेवारी, २०१६ चे पत्रान्वये जिल्हा नियोजन समितीने जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती यांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये जिल्हाधिकारी अकोला यांनी नाविण्यपुर्ण योजने अंतर्गत रु. २९ लक्ष इतकी अंदाजे किमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. अकोला यांनी सदरचे प्रस्तावास जि.प. स्तरावर दि. ६.२.२०१६ ला प्रशासकीय मंजुरी दिली आहे. तदनंतर सर्व पं.स. स्तरावर गट विकास अधिकारी यांनी ६.२.२०१६ ला निविदा प्रक्रिया सुरु करुन सदरचे साहित्य खरेदी केले परंतु सदर खरेदीबाबत विविध वृत्तपत्रात बातम्या आल्याने दि. २४.१०.२०१६ ला जिल्हा नियोजन समितीच्या निरिक्षण पथकाने सदर कामाबाबत प.सं. स्तरावर निरिक्षण केले आहे.

त्यांचे निरिक्षण अहवालानुसार पं.सं. अकोला येथे बसविण्यात आलेल्या सी.सी.टी.व्ही यंत्रणेमध्ये पुरविण्यात आलेल्या ७ सी.सी.टी.व्ही. पैकी ६ बंद असल्याचे आढळले आणि वेगवेगळया प्रकारचे (specification) चे कॅमेरे बसविण्यात आले. पुरवठादाराने संबंधित कर्मचाऱ्यांना सी.सी.टी.व्ही यंत्रणा हाताळण्याबाबत प्रशिक्षण दिले नसल्याचे आढळले व इतर अडचणीबाबत पुरवठा दाराकडुन उत्तम प्रतिसाद मिळत नाही यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि. ८.११.२०१६ अन्वये पुरवठादारावर काळया यादीत टाकणे व केलेल्या प्रदानाची वसुली करण्याबाबत गट विकास अधिकाऱ्यांना पंचायत समिती स्तरावरुन कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत त्यानुसार पंचायत समिती स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे आहे.

(४) ग्रामविकास विभागाकडुन उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांना सदर बाबत चौकशी करण्यासाठी आदेशित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात प्रत्येक जिल्हयात सार्वजनिक-खाजगी सहभागातून वैद्‌यकीय महाविद्‌यालय सुरु करण्याचा निर्णय

**(३७) * ६५३६६ श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.विजय औटी (पारनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील**

**(एरंडोल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रत्येक जिल्ह्यात सार्वजनिक-खाजगी सहभागातून वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत मा. मुख्यमंत्री यांनी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये घोषणा केल्यानंतरही अद्याप वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत जेष्ठ वैद्यकीय अध्यापक डॉ. मिश्रा यांच्या समितीने मा. मुख्यमंत्र्यांना अहवाल सादर केला आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण भागातील गरीब होतकरु विद्यार्थ्यांना वैद्यकीय सेवेचा लाभ घेता यावा म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात ज्या जिल्हयात शासकीय वैद्यकीय महाविद्यालये अस्तित्वात नाही अशा जिल्हयांत खाजगी भागीदारीतून आरोग्य सेवा संचालनालयाच्या अधिपत्याखालील जिल्हा रुग्णालयास संलग्नीत वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. याअनुषंगाने शासकीय रुग्णालये व खाजगी सहभाग (खाजगी संस्था/व्यक्ती/स्वयंसेवी संस्था) यांच्यामध्ये सामंजस्य करार (MOU) करण्याबाबतची कार्यवाही सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सुरु आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

तथापि, सार्वजनिक -खाजगी तत्वावर वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत समिती स्थापना केली असून समितीने अहवाल सादर केलेला आहे.

(३) केंद्र शासनामार्फत जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या श्रेणीवर्धनाकरिता अनुदान प्राप्तीसाठी उपयोग करुन सदरची योजना कार्यान्वीत करण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील मुंब्रा परिसरातील पारसिक डोंगरावर झोपडपट्ट्यांचे अतिक्रमण वाढत असल्याबाबत

**(३८) * ७१३२८ श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील मुंब्रा परिसरातील पारसिक डोंगररांगांवर दिवसागणिक झोपडपट्ट्यांचे अतिक्रमण वाढत असून दिनांक २१ जून ते ३० ऑगस्ट, २०१६ या कालावधीत या भागात सहापेक्षा अधिक ठिकाणी दरड कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभागाने सदर अतिक्रमणाच्या विरोधात कारवाई न करता या ठिकाणी केवळ फलक उभारुन धोक्याची सूचना लावलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) ठाणे येथील मुंब्रा परिसरातील पारसिक डोंगर रांगावर झोपडपट्टयांचे अतिक्रमण करण्याचा प्रयत्न होत असतो. परंतु दिनांक २१ जून, २०१६ ते ३० ऑगस्ट, २०१६ या कालावधीत कोणत्याही प्रकारची दरड कोसळल्याची घटना घडल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२), (३) व (४) हे खरे नाही. पारसिक डोंगर परिसरातील भौगोलीक परिस्थितीचा विचार करता त्या ठिकाणी दरड कोसळण्याचा धोका असल्यामुळे वन विभागामार्फत नागरिकांना दक्षता घेण्यासाठी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून फलक लावण्यात आले आहेत.

दिनांक १ एप्रिल, २०१६ ते ऑक्टोंबर, २०१६ अखेर पर्यंत एकूण १५६ नविन अतिक्रमणे झाल्याचे निदर्शनास आले आहे. व सदर अतिक्रमणे निष्कासीत करुन वनजमिन मोकळी करण्यात आली आहे.

नव्याने झालेले अतिक्रमण तात्काळ निष्कासीत करण्यात आलेले असल्याने संबंधीतांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‍भवत नाही.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

----------------

**ठाणे येथील सुरज वॉटर पार्कने वन जमिनीवर अतिक्रमण केल्याबाबत**

**(३९) * ७०६५८ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथील वाघबीळनजीक असलेल्या सुरज वॉटरपार्क ने सर्व्हे क्र. १५६ व २९१ ह्या जमिनीवर “अधिसूचित वन” म्हणून वन विभागाकडे नोंद असतानाही या जागेवर पॅगोडा, क्रेझी रिव्हर, भगवान शंकराची मोठी मुर्ती व इतर किरकोळ बांधकामे करुन जमिन बळकावून शासनाचे २० कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान केल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुरज वॉटर पार्कने या १ हेक्टर जमिनीवर अतिक्रमण केल्याबाबत वन विभागाकडून मागील काही वर्षापासून नोटीस पाठवूनही अद्यापही कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या अधिसूचित वन म्हणून नोंद असलेल्या जागेवरील अतिक्रमण तातडीने निष्कासित करण्याबाबत मा.न्यायालयाचे स्पष्ट आदेश असतानाही वन विभागाकडून कार्यवाही करण्यास जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‍नुसार शासकीय जागेवर नियमांचे उल्लंघन करुन अतिक्रमण करणाऱ्या सुरज वॉटर पार्कचे व्यवस्थापक व याबाबत जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित वन विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणाबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

सुरज वॉटर पार्कसाठी वनहद्दीत सुमारे १ हे. क्षेत्रात अतिक्रमण केल्याचे दिनांक ६/०१/२०१० रोजी वनविभागाने केलेल्या सर्वेक्षणात निर्दशनास आल्यानंतर सदर अतिक्रमणाकरिता सुरज वॉटर पार्कचे व्यवस्थापक श्री. जयेश मुच्छाला यांचेविरुध्द वनगुन्हा क्र. एम-२५/२००९-२०१० नोंदविण्यात आला आहे.

(२), (३) व (४) सदरचे अतिक्रमण दि. १८/२/२०११ व दि. ४/३/२०११ रोजी निष्कासित करण्यात आले आहे. सदर अतिक्रमण निष्कासनासाठी झालेला खर्च रक्कम रु.३५५८३/- (रक्कम रुपये पस्तीस हजार पाचशे त्र्याऐंशी मात्र) सुरज वॉटर पार्ककडून वसूल करण्यात आला आहे. तसेच जुलै २०११ ते माहे नोव्हेंबर २०१३ मध्ये सुरज वॉटर पार्क यांचे खाजगी क्षेत्राच्या व संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या संयुक्त हद्दीवर सलोह कॉंक्रीटची भिंत बांधण्यात आली आहे.

वनविभागाने केलेल्या चौकशीत सुरज वॉटर पार्कसाठी अतिक्रमण केल्याचे आढळून आल्यानंतर सुरज वॉटर पार्कचे व्यवस्थापक श्री. जयेश मुच्छाला यांचेविरुध्द वनगुन्हा नोंदवून त्यांचेविरुध्द न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग कोर्ट क्र.२, ठाणे येथे क्रिमिनल केस क्र. ३४४/२०११ दाखल करण्यात आली होती. सदरची केस दि.१६/७/२०१४ रोजी मा.न्यायालयाव्दारे निकाली काढणेत आली असून आरोपीची निदोष मुक्तता झाली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्राची झालेली दुरवस्था

**(४०) * ६५०६१ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १६ आदिवासी जिल्हयातील ४११ प्राथमिक आरोग्य केंद्र व २३२२ उपकेंद्र असून यातील बहुतेक आरोग्य केंद्रावर पुरेशा सुविधांचा अभाव असून डॉक्टरांना राहण्यासाठी योग्य व्यवस्थाही नाही तसेच रुग्णापर्यंत पोहचण्यास वाहतूकीची सुविधा नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतेक केंद्रामध्ये पावसाळ्यात लागलेली गळती, साप विंचू याचा असलेला वावर, पिण्याच्या पाण्याची व स्वच्छता गृहांची दयनिय अवस्था असून, नंदूरबार येथे अक्कलकुवा मांडवा प्राथमिक आरोग्य केंद्रावर हंड्याने नदीवरुन पाणी आणावे लागते तर, उपकेंद्रावर औषधांची वाहतूक गाढवावरुन करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार प्राथमिक आरोग्य केंद्राचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

राज्यातील १६ आदिवासी जिल्हयामध्ये ३१५ प्राथमिक आरोग्य केंद्रे व २०७५ उपकेंद्रे कार्यरत आहेत. ३१५ प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकी २८४ ठिकाणी वैद्यकीय अधिकारी निवासस्थाने व २८७ ठिकाणी वाहने उपलब्ध आहेत. जेथे वाहन उपलब्ध नाही अशा ठिकाणी १०८ रुग्णवाहिकेची मदत घेतली जाते.

(२) हे खरे नाही.

पावसाळयात थोडयाफार प्रमाणात गळती झाल्यास संबंधित जिल्हा नियोजन विकास मंडळामार्फत दुरुस्तीचे कामे केली जातात. आरोग्य संस्थेमध्ये साप विंचू यांचा वावर असल्याच्या घटना नगण्य आहेत. ज्या आरोग्य संस्था स्वत:च्या इमारतीत कार्यरत आहेत त्याठिकाणी पाणी व स्वच्छतागृहाची सुविधा आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र मांडवाच्या जवळ विहीर व हॅण्डपंप असल्याने त्याठिकाणावरुन पाणी आणले जाते. औषधाची वाहतुक शासकीय वाहनांमार्फत केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) जिल्हा नियोजन विकास मंडळ व आदिवासी उपयोजनेतंर्गत प्राप्त निधीमधून आरोग्य संस्थांचा दर्जा सुधारण्याचे काम करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ४०० धरणांना धोका निर्माण झाल्याबाबत

**(४१) * ६८०७१ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), डॉ.आशिष देशमुख (काटोल), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन (मेरी) संस्थेने राज्यातील ३ हजार १०२ धरणांचे सन २०१६ च्या मान्सुनपूर्वी सर्वेक्षण केले असता राज्यातील सुमारे ४०० धरणे असुरक्षित असून धरणांच्या ठिकाणी किरकोळ ते गंभीर स्वरूपाच्या दुरूस्त्या तातडीने करण्याची आवश्यकता असल्याबाबतचा अहवाल या संस्थेने सादर केला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वर्षी राज्यात चांगला पाऊस झाला असल्याने धरणे पूर्ण क्षमतेने भरली आहेत अशा परिस्थितीत धरणांची सुरक्षितता राखण्याच्या दृष्टीने मेरी या संस्थेने सादर केलेल्या अहवालानुसार या धरणांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन (मेरी) या संस्थेने सन २०१५ च्या नियमित क्षेत्रीय मान्सूनपूर्व व मान्सूनोत्तर अहवालावर आधारित १३०९ धरणांचा (वर्ग-१ व वर्ग-२) धरणस्थिती अहवाल शासनास जुलै, २०१६ मध्ये सादर केला आहे. सद्यस्थितीत राज्यातील कोणतेही धरण असुरक्षित आहे अशी वस्तुस्थिती नाही.

(२) धरण सुरक्षितता संघटनेच्या धरणस्थिती अहवालानुसार करावयाच्या सुधारणा व त्यावर संनियंत्रण ठेवण्याची जबाबदारी महासंचालक, मेरी यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे. धरणामध्ये निदर्शनास आलेल्या त्रुटींच्या गांभीर्यानुसार क्षेत्रीय स्तरावरुन प्राधान्याने उपाययोजना केली जाते

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या विविध मागण्यांबाबत**

**(४२) * ६५७६१ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जवळपास २ लाख ७ हजार अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस गेल्या अनेक वर्षापासून त्यांच्या विविध मागण्यांसाठी संघर्ष करीत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा, मानधनात वाढ व कामगार विमा योजना अद्यापही मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्रापेक्षा कमी उत्पन्न व मागास असलेल्या पॉंडीचेरी राज्याने सेविका व मदतनिसांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा दिला असून तामिळनाडू व हरीयाणा या राज्यांमध्ये अंगणवाडी सेविकांना देण्यात येणारे मानधन पहाता महाराष्ट्रात देण्यात येणारे मानधन फार कमी प्रमाणात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देऊन त्यांचे मानधन वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून केंद्र शासनाने अनुज्ञेय केलेले सर्व लाभ अंगणवाडी कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले आहेत. तथापि केंद्र शासनाकडून या कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा, कामगार विमा योजना हे लाभ देण्यात आलेले नसल्यामुळे राज्याकडून ते लाभ देण्यात आलेले नाहीत. हे खरे आहे.

(३) व (४) राज्यातील अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या मानधनात शासनाने दिनांक ०१ एप्रिल, २०१४ पासून अनुक्रमे रु.९५०/-, रु.५५०/- व रु.५००/- इतकी वाढ केलेली असून ते एकूण रु.५०००/-, रु.३२५०/- व रु.२५००/- इतके करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील नॉनट्रान्सप्लांट सेंटरची संख्या वाढविण्याबाबत**

**(४३) * ७२१२२ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सद्यस्थितीत सुमारे चार हजार रुग्ण किडनीच्या प्रतीक्षेत असून राज्यातील बहुतांशी रुग्णालयांकडे ब्रेनडेड झालेल्या रुग्णांचे अवयव काढून घेण्याचा परवाना नसल्याने सदर परवाना असलेल्या रुग्णालयात संबधित ब्रेनडेड झालेल्या रुग्णाला न्यावे लागत असल्याने बहुमुल्य वेळ वाया जात असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील फक्त अवयव काढून घेणाऱ्या रुग्णालयांची (नॉन ट्रान्सप्लांट सेंटरची) संख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) नाही.

महाराष्ट्र राज्यात १२३ ट्रान्सप्लांट सेंटर आहेत. ज्यामध्ये ब्रेनडेड रुग्णांचे अवयव काढता येतात. या व्यतिरिक्त ५४ नॉनट्रान्सप्लांट ऑर्गन रिट्राव्हल सेंटर (NTORC) म्हणजेच अवयव काढता येतील, अशी रुग्णालये आहेत. राज्यात सुमारे २०२१ रुग्ण किडनीच्या प्रतिक्षेत आहेत.
(२) राज्यातील अवयव काढून घेणाऱ्या नॉनट्रान्सप्लांट सेंटरची संख्या वाढविण्याकरिता सर्व जिल्हा शल्य चिकित्सकांना त्यांच्या जिल्हयातील सर्व शासकीय व खाजगी रुग्णालयांची तपासणी करुन प्रस्ताव संचालक, आरोग्य सेवा तथा समुचित प्राधिकारी यांना सादर करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

राज्यात नॉन ट्रान्सप्लांट सेंटरच्या नोंदणीसाठी प्राप्त २२६ रुग्णालयाच्या अर्जापैकी ५४ रुग्णालयांना नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले असून उर्वरित रुग्णालयांच्या प्रस्तावात त्रुटी असल्याने त्या पुर्ण करण्यासंदर्भात पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दापोली (जि.रत्नागिरी) येथील भोमडी फाटा, मौजे बातवली ते चिपाटा या रस्त्याची झालेली दुरवस्था

**(४४) * ७०९७९ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) येथील भोमडी फाटा, मौजे बातवली ते चिपाटा या संपूर्ण रस्त्याची अतिपर्जन्यवृष्टीमुळे अत्यंत खराब अवस्था झाली असून तालुक्याला जोडणारा हा महत्वाचा रस्ता असल्याने ग्रामस्थ व पर्यटकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे १२.६० कि.मी. चा हा रस्ता अत्यंत महत्वाचा असूनही मागील दोन वर्षात रस्ते व पूल, दुरुस्ती व परीरक्षण या कार्यक्रमातंर्गत अत्यल्प निधी जिल्हा परिषदेला उपलब्ध करुन देण्यात आल्याने या रस्त्याची संपूर्ण दुरुस्ती झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्याला रस्ते दुरुस्तीसाठी उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप लक्षात घेता या रस्त्याला मिळणारा निधी अत्यल्प असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागील दोन वर्षापासून पाठपूरावा करुनही जिल्हा वार्षिक योजना आराखडयामध्ये संपूर्ण रस्त्याच्या दुरुस्तीचा समावेश अद्याप करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या रस्त्याच्या मजबुतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्याबाबत शासन तात्काळ कार्यवाही करणार आहे काय

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे. एकूण १२.६०० कि.मी. लांबीपैकी ७.६०० कि.मी.पृष्ठभाग खराब असल्याने वाहतुकीस गैरसोय होत आहे.

(२) संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी. इतकी असून अस्तित्वातील लांबी २०३९९७.०० कि.मी. इतकी आहे.

सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या व मानव विकास निर्देशकाच्या प्रमाणात करण्यात येते. त्यानुसार रत्नागिरी जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ८०८५.३५ कि.मी. इतकी असून अस्तित्वातील लांबी ६४४१.११ कि.मी इतकी आहे. रत्नागिरी जिल्हा परिषदेस सन २०१२-१३ ते २०१६-१७ या कालावधीत रस्ते, पुल दुरुस्ती व परिरक्षण या कार्यक्रमांतर्गत रु.३८९६.९२ लक्ष, तेरावा वित्त आयोगाअंतर्गत रु.७२८.५१ लक्ष तर पुरहानी कार्यक्रमांतर्गत रु.१७००.६३ लक्ष असा एकूण रु.६३२६.०६ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(३) व (४) सन २०१५-१६ मध्ये या रस्त्यावर रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रम गट-ब अंतर्गत ३/३०० ते ६/८०० कि.मी. मध्ये नवीन डांबरीकरणाचे काम मंजुर आहे.

सन २०१६-१७ अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना आराखडा तयार करण्यात येत असून या आराखड्यामध्ये रस्त्याच्या खराब झालेल्या संपूर्ण लांबीमध्ये दुरुस्तीचे काम प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## पुणे-मुंबई द्रुतगती व मुंबई-गोवा महामार्गावर वैद्यकीय महाविद्‌यालय व ट्रामा सेंटर उभारण्याबाबत

**(४५) * ६६१६२ श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर सहा वर्षात ५०० नागरिकांचा तर मुंबई-गोवा महामार्गावर २५६ व्यक्तींना वेळीच उपचार न मिळाल्यामुळे त्यांचा मृत्यु झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन्ही महामार्गावर अपघात झाल्यास जखमीना तातडीने उपचार मिळावेत यासाठी या मार्गावर मेडिकल महाविद्यालय व ट्रामा सेंटर उभारण्यात यावे म्हणून प्रवाशांकडून सातत्याने मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे-मुंबई द्रुतगती व मुंबई-गोवा महामार्गावर योग्य ठिकाणी मेडिकल महाविद्यालय व ट्रामा सेंटर उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) पोलीस विभागाच्या माहितीनुसार मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर सन २०१०-२०१६ या कालावधीत एकूण ४६३४ अपघात झाले असून त्यात एकूण १३२३ व्यक्ती मृत्युमुखी पडल्या आहेत.

तसेच मुंबई-गोवा महामार्गावरील सन २०११-१२ ते ऑक्टोबर-२०१६ या कालावधीत उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयात दाखल झालेल्या १०५०८ अपघातग्रस्त व्यक्तींपैकी १९६८ व्यक्ती मृत्यू पावलेल्या आहेत. परंतु पुणे मुंबई-द्रुतगती मार्गावर सहा वर्षात ५०० नागरिकांना तसेच मुंबई-गोवा महामार्गावर २५६ व्यक्तींना वेळीच उपचार न मिळाल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला अशी आकडेवारी उपलब्ध नाही.

(२) सदर महामार्गावर ट्रॉमा सेंटर उभारण्याची मागणी होत आहे ही बाब खरी आहे. तथापि, मेडीकल महाविद्यालय उभारण्याची मागणी अथवा प्रस्ताव वैद्यकीय शिक्षण विभागाकडे प्राप्त झालेला नाही.

(३) पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर होणा-या अपघातांचा विचार करुन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून सदर रस्त्यावर ट्रामा केअर युनिट व गरजेनुसार हवाई रुग्णवाहिका सुविधा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.ओझर्डे येथे उद्योजकामार्फत खाजगी जागेवर ट्रॉमा केअर युनिट व हेलिपोर्ट उभारण्यात आले आहे. सदर महामार्गावर संकटकाळी मदत करण्यासाठी टोल फ्री दुरध्वनी सेवा क्र.९८२२४९८२२४, वैद्यकीय मदत,१०८ क्रमांकाची रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच खालापूर टोलनाका, दस्तुरी, कुसगाव येथील कॉल सेंटर, तळेगांव टोलनाका या चार ठिकाणी रुग्णवाहिका सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. तसेच Quick Response Vehicle तीन ठिकाणी उपलब्ध असून अपघाताच्या वेळेस त्यांच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात येतात. ठाणे, रायगड व

पालघर जिल्हयातील सर्व आरोग्य संस्थांमध्ये १०८ क्रमांकाच्या एकूण ९२ रुग्णवाहिका वैद्यकीय पथकासह, जीवरक्षक औषधसामुग्री व सुविधासह कार्यरत असून, त्यांच्याद्वारे अपघात तसेच अत्यावश्यक वेळी आरोग्य सेवा पुरविण्यात येतात.

मुंबई गोवा महामार्गावर ग्रामीण रुग्णालय पनवेल, महाड, पोलादपूर, उपजिल्हा रुग्णालय पेण, माणगांव तसेच ट्रॉमा केअर युनिट महाड येथे कार्यान्वित आहेत. या रुग्णालयांमधून अपघाती रुग्णांना तातडीने रुग्णसेवा पुरविल्या जात आहेत. अपघाती रुग्णांना तातडीने सेवा उपलब्ध होण्यासाठी रायगड जिल्हयातील वडखळ नाका येथे नव्याने ग्रामीण रुग्णालय व ट्रॉमा केअर युनिट स्थापनेस मान्यता दिलेली आहे. केंद्र शासनाच्या सुवर्ण चतुष्कोण योजनेअंतर्गत पुणे व कोल्हापूर येथे ट्रॉमा केअर सेंटर ची उभारणी करण्यात आली आहे. जिल्हा शासकीय रुग्णालय,आरोस येथे वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय निर्माण करण्याबाबतची शक्यता पडताळण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अहमदनगर जिल्हयात आठ महिन्यांत २१ बिबटयांचा झालेला मृत्यू**

**(४६) * ६६९६९ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात आठ महिन्यांत २१ बिबटयांचा मृत्यू झाल्याची माहिती दिनांक १३ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार बिबट्यांची मृत्यु होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, बिबट्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शासनाने कोणती प्रभावी उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) अहमदनगर जिल्ह्यामध्ये माहे जानेवारी, २०१६ ते सप्टेंबर, २०१६ अखेर या कालावधीत नैसर्गिकरित्या-१२, विहीरीत पडुन-७, अपघाताने-५ व आपसातील झुंजीने-६ अशा प्रकारे एकूण ३० बिबट्यांचा मृत्यू झाला आहे.

(३) बिबट्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अहमदनगर जिल्ह्यात खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

• वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने राज्य योजना, जिल्हा योजना आदिवासी / सर्वसाधारण व इतर योजनांतर्गत उपलब्ध निधीच्या अनुषंगाने वनतळे / वनबंधारे / सिमेंट बंधारे/ पाणवठे इत्यादी बांधकामे करण्यात आली आहेत.

• बिबट्यांचा मृत्यू रस्ते अपघातात होऊ नये म्हणून रस्त्याच्या बाजूला व वळणावर सावधानतेचे फ्लेक्स बोर्ड लावण्यात आलेले आहेत.

• बिबट प्रवण क्षेत्रातील गावात घडीपत्रीका वाटप करुन पोस्टर्स सार्वजनिक ठिकाणी लावण्यात आलेले आहेत.

• अहमदनगर व संगमनरे विभागांमध्ये प्रत्येकी २ रेस्क्यु पथके निर्माण करण्यात आलेले असून पथकातील कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. सदर पथकातील सदस्यांना वन्यप्राण्यांस बेशुध्द करण्याकरिता विशेष ट्रॅन्क्युलायझिंग गन तसेच वन्यप्राण्यांची ओळख पटविण्याकरिता कॅमेरा ट्रॅप इत्यादी साहित्य उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## पुणे शहरात बहुतांश टेकड्या सुरक्षा व्यवस्थेअभावी असुरक्षित असल्याबाबत

**(४७) * ७१०५७ श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात बहुतांश टेकड्या सुरक्षा व्यवस्थेअभावी असुरक्षित असल्याने वनांची सुरक्षा धोक्यात आली असून मुख्यत: हनुमान टेकडी, वेताळ टेकडी व फर्ग्युसन टेकडी परिसरातील चंदनाच्या चोरीसह आयुर्वेदिक वनसंपदा नष्ट करण्याचे प्रकार वाढत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरातील टेकड्यांच्या सुरक्षाच्या दृष्टीने शासनाने कोणत्या आवश्यक त्या उपाययोजना केल्या व करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.
(२) पुणे शहरातील राखीव वनक्षेत्र असलेल्या टेकडयांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शासनाने सदर टेकडयांच्या सभोवताली संरक्षणासाठी सीमा भिंत बांधण्याचे काम टप्याटप्याने हाती घेतले आहे. सदर सीमा भिंतीचे २०२९७ र.मी. काम आतापर्यंत पुर्ण झाले आहे. पुणे शहरात नागरी संयुक्त वन व्यवस्थापन समित्या स्थापन करण्यात आल्या असुन त्यांच्या सहकार्याने सदरच्या टेकडयाचे संरक्षण केले जात आहे.

तसेच पुणे शहरात वनक्षेत्र असलेल्या टेकडयांवर टप्याटप्याने वन उदयान तयार करण्याची योजना सुध्दा वनविभागाने हाती घेतली आहे.
(३) विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयात चिकनगुनिया आजारावरील हायड्रोक्सिक्लोरोक्विन औषधांचा शासकीय रुग्णालयांत तुटवडा असल्याबाबत

**(४८) * ६७३२२ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयात चिकनगुनियामुळे होणाऱ्या असहय सांधेदुखीवरील हायड्रोक्सिक्लोरोक्विन औषधांचा शासकीय रुग्णालयांत तुटवडा असल्याचे राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या बैठकीत माहे ऑक्टोंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय रुग्णालयांत हायड्रोक्सिक्लोरोक्विन औषधांचा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

चिकनगुन्या आजारावरील सांधेदुखीसाठी हायड्रोक्सिक्लोरोक्विन अथवा क्लोरोक्विन फॉस्फेट या औषधांचा वापर केला जातो. तथापि, क्लोरोक्विन फॉस्फेट हे औषध राज्यस्तरावर नियमित स्वरुपात खरेदी केले जात असून राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये सदर औषध पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(४९) * ६५९८७ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, वडाळा, मुंबई अंतर्गत राज्यात सुमारे २ हजार २८० कर्मचारी कार्यरत असून रायगड जिल्हयात जिल्हा रूग्णालय, उपजिल्हा रूग्णालय व ग्रामीण रूग्णालयामध्ये सुमारे ५५ कर्मचारी कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एड्स (एच.आय.व्ही.) हा रोग बरा होण्यासाठी कोणतेही प्रभावी औषध अथवा लस उपलब्ध नसतानाही सदर कर्मचारी डापकू, आयसीटीसी, एसटीआय, एआरटी व रक्तपेढी विभागात गेली १५ वर्षे कमी वेतनावर काम करत आहेत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, एड्स असलेल्या रूग्णावर उपचार करताना त्या आजाराची लागण अथवा इजा झाल्यास या कर्मचाऱ्यांना कोणतेही विमा संरक्षण नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांना कायम सेवेत सामावून घेण्यासाठीचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

नॅको, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेअंतर्गत सध्या कार्यरत २२८० कर्मचाऱ्यांपैकी २२७४ कर्मचाऱ्यांची नियुक्ती कंत्राटी पद्धतीने करण्यात आली आहे. तसेच रायगड जिल्हयात जिल्हा रूग्णालय, उप जिल्हा रूग्णालय व ग्रामीण रूग्णालयामध्ये सुमारे ५५ कर्मचारी कार्यरत आहेत.

(२) नॅको, नवी दिल्ली या शिखर संस्थेकडून १०० टक्के केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम राबविण्याकरीता वार्षिक कृती आराखड्यान्वये दरवर्षी अनुदान महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेस वितरीत करण्यात येते. सदर अनुदानातून नॅको ने निश्चित केल्यानुसार मासिक एकत्रित पारिश्रामिक अदा करण्यात येते.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५) महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेंतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायम करण्याबाबतचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करण्यात आला होता. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२५.०८.२००५ च्या परिपत्रकान्वये शासन सेवेतील सर्व पदांवरील नियुक्त्या विहित मार्गाने/ माध्यमामार्फत कराव्यात असे शासनाचे निदेश आहेत. तद्नुसार महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण कर्मचारी संघटना व महाराष्ट्र राज्य राजपत्रित वैद्यकीय अधिकारी गट अ संघटना यांना दि.२१.११.२०१५ रोजीच्या शासन पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कुपोषित बालकांच्या संख्येत वाढ झाल्याबाबत

**(५०) * ६५१०१ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.किसन**

**कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विजय औटी (पारनेर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: पालघर, धुळे, नंदूरबार, जळगाव, नाशिक, रायगड, रत्नागिरी, अहमदनगर, मुंबई, पुणे, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, अमरावती व नांदेड इत्यादी जिल्हयात कुपोषित बालकांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झाल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असून, पालघर जिल्हयातील मोखाडा, जव्हार, विक्रमगड आणि वाडा या तालुक्यात माहे एप्रिल, २०१६ पासून आजमितीस अवघ्या पाच महिन्याच्या कालावधीत सुमारे ६०० बालकांचा कुपोषणामुळे मृत्यू झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच कुपोषणामुळे ५०० ते ६०० मुलांचा बळी गेल्याने सर्वोच्च न्यायालयाने याबाबत शासनाची अनास्था व निष्क्रियतेबाबत कडक शब्दात ताशेरे ओढले असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कुपोषित बालकांच्या संख्येत वाढ होत असतानाही एकात्मिक बालविकास योजनेच्या अंदाजपत्रकात कपात करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत त्यानुसार चौकशीत दोषी आढळलेल्या व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत व कुपोषणाला आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणत्या तातडीच्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय अशंत: खरे आहे.

माहे सप्टेंबर, २०१५ व माहे सप्टेंबर, २०१६ या कालावधीतील सदर जिल्ह्यांची कुपोषणाबाबतची श्रेणीनिहाय माहितीचा तपशिल पाहता मागील वर्षीच्या तुलनेत ह्या वर्षी कुपोषणाचे प्रमाणात घट झालेली आहे. पालघर, नंदुरबार, जळगांव, रायगड, गडचिरोली, नागपूर, अमरावती, नांदेड व मुंबई शहर इत्यादी जिल्ह्यात मागील वर्षीच्या तुलनेत सप्टेंबर, २०१६ मध्ये थोड्या प्रमाणात वाढ झालेली आहे. पावसामुळे उदभवणाऱ्या विविध आजारांमुळे (उदा.डायरिया, कॉलरा, न्युमोनिया इ.) कुपोषणाचे प्रमाण थोड्याफार प्रमाणात या कालावधीत वाढते.

माहे एप्रिल, २०१६ ते ऑगस्ट, २०१६ पर्यंत पालघर जिल्ह्यातील मोखाडा, जव्हार, विक्रमगड आणि वाडा या तालुक्यात ० ते ६ वर्ष वयाच्या बालकांचे १४७ बालमृत्यू झालेले आहेत. सदर बालमृत्यू हे कुपोषणामुळे झालेले नसून विविध आजार / कारणांमुळे झालेले आहे.)

(२) होय.

(३) उपलब्ध साधनसंपत्तीचा विचार करुन निधी वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडीतील ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके, गर्भवती, स्त्रिया व स्तनदा माता, तीव्र कमी वजनाची बालके, तसेच किशोरवयीन मुली यांना घरपोच आहार (THR) व ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थी यांना गरम ताजा आहाराचा पुरवठा स्थानिक स्वयंसहाय्यता महिला बचतगट/महिला मंडळ, तसेच महिला संस्था यांचेमार्फत करण्यात येत आहे.

सदर योजनेंतर्गत सर्वसाधारण श्रेणीतील बालकांना दररोज ५०० उष्मांक आणि १२ ते १५ ग्रॅम प्रथिने असलेला आहार देण्यात येतो. त्याचप्रमाणे तीव्र कमी वजनाच्या बालकांना ८०० उष्मांक आणि २० ते २५ ग्रॅम प्रथिने असलेला आहार देण्यात येतो व नवसंजीवन क्षेत्रातील बालकांना प्रति दिन ९५० कॅलरी व २३ ते २८ ग्रॅम असलेला आहार पुरविण्यात येतो. याप्रमाणे अंगणवाडीतील लाभार्थ्यांना पोषण आहारातून आवश्यक ते प्रथिने व कॅलरीज देण्यात येत आहेत.

तसेच एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुर्नरचना या योजनेंतर्गत २० जिल्ह्यातील ग्रामीण / आदिवासी व नागरी प्रकल्पातील अंगणवाडी केंद्रातील लाभार्थ्यांना अंडी, केळी पुरवठा करण्यात आलेला आहे.

-----------------

### राज्यातील मोठ्या धरणातून गाळ मिश्रीत रेती काढण्याबाबत

**(५१) * ६७७७० श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मोठ्या धरणातून गाळ मिश्रीत रेती काढण्याबाबतचा प्रलंबित असलेला निर्णय घेण्यास शासनाकडून विलंब होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी निर्णय न झाल्यामुळे राज्याचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी तातडीने निर्णय घेण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी मा.जलसंपदा मंत्री/मा.महसूल मंत्री यांच्याकडे माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने शासनाने तातडीने निर्णय घेण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.
(२) नाही, प्रचलीत पध्दतीने कार्यवाही चालू आहे.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही. सुधारीत धोरण करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महानगरपालिकेचे मुख्य उत्पन्न असलेले जकात कर व एलबीटी रद्द झाल्याने विकास कामांवर झालेला परिणाम**

**(५२) * ६५०६२ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने “वस्तु आणि सेवा कर” (जीएसटी) विधेयक विधानसभेत मंजूर केल्यानंतर केंद्र शासनाने दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेमधील कलम १७ मधील तरतुदीनुसार मुंबई महानगरपालिकेचा जकात तसेच अन्य महानगरपालिकांना ५० कोटीपेक्षा जास्त उलाढालीवर स्थानिक संस्था कर (एलबीटी) इंधन आणि मद्य सोडून अन्य वस्तूंवर उत्पादन शुल्क वसूलीचा अधिकार नसल्याने महानगरपालिका व नगरपालिकांचे महसूलाचे मुख्य स्त्रोत बंद झाल्याने महानगरपालिका व नगरपालिकांची विकासकामे बंद झाली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, देशातील पेट्रोलियम आणि मद्य वगळता इतर उत्पादनावरील अबकारी करही पालिकांना गोळा करता येणार नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त अधिसूचनेतील तरतूदीनुसार मुंबई महानगरपालिकेने दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ रोजीनंतर जमा केलेला जकात कर तसेच राज्यातील इतर महानगरपालिकांनी जमा केलेला एलबीटी कर परत करण्यात आला आहे काय,
(४) असल्यास, जकात कर व एलबीटी रद्द केल्यामुळे महानगरपालिकेला जकात करातून मिळणारे उत्पन्न बंद होणार आहे त्यामुळे आर्थिक बाबीवर परिणाम होवून विकास कामांवर त्याचा परिणाम होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, जकात कर व एलबीटी रद्द झाल्याने राज्याला होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी व राज्याला जीएसटीमध्ये योग्य वाटा मिळवून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) नाही. संविधान (१०१ संशोधन) कायद्याच्या कलम १९ अन्वये अस्तित्वातल्या कर कायद्यातील तरतूदी, संविधान संशोधन कायद्याशी सुसंगत नसतील तर त्या तरतूदी जोपर्यंत राज्यविधिमंडळ निरसित करीत नाही वा एक वर्षा पर्यंत म्हणजेच १५ सप्टेंबर २०१७, यातील जे अगोदर घडेल तोपर्यंत लागू राहतील. जकात व स्थानिक संस्था कराचे प्राविधान निरसित झाले नसल्याने महानगरपालिका हद्दीत आयात होणाऱ्या वस्तूंवर दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ नंतरही मुंबई महानगरपालिका जकात तसेच अन्य महानगरपलिका एलबीटी गोळा करु शकते.
(२) नाही. संविधानातील प्राविधानानुसार मद्य वगळता उत्पादनावरील अबकारी कर गोळा करण्याचा अधिकार केंद्र शासनास आहे, राज्यशासन व पालिकांना नाही.
(३) नाही.
(४) नाही. संविधान (१०१ संशोधन) कायद्याच्या कलम १८ नुसार वस्तू व सेवा कराच्या अवलंबनानंतर पाच वर्षे, राज्याच्या तसेच महानगरपालिकांच्या अपेक्षीत कर वसूलीत कमतरता आल्यास केंद्रशासनामार्फत भरपाई होणार आहे. नुकसान भरपाई प्राप्त होणार असल्यामुळे महानगर पालिकांच्या आर्थिक बाबींवर त्याचा परिणाम होणार नाही.

(५) केंद्रशासनामार्फत वस्तू व सेवा कराच्या अवलंबनानंतर राज्यांना द्यावयाच्या नुकसान भरपाई बाबतचा कायदा संसदे मध्ये मांडण्यात येणार आहे. त्या कायद्या मधील प्राविधानावर राज्यास जीएसटी अंतर्गत योग्य भरपाई मिळण्याकरिता केंद्रशासनास राज्याने सूचना सादर केल्या आहेत.

-----------------

## राज्यातील महिला व बाल विकास विभागाच्या निधीत कपात करण्यात आल्याबाबत

**(५३) * ६५०६६ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बाल विकास विभागाने सन २०१६-१७ वर्षाकरिता बाल कल्याणासाठी वार्षिक ८० कोटी निधीची आवश्यकता असताना अवघे २६ कोटी निधीची तरतूद केली व त्यातूनही २० टक्के कपात करुन २१ कोटीचा निधी महिला व बाल कल्याण आयुक्तांच्या संगणक प्रणालीवर (बीडीएस) उपलब्ध असूनही माहे ऑगस्ट, २०१६ अखेरपर्यंत तो खर्च करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिला व बालकल्याण विभागाच्या या गैरप्रकारामुळे पुरेसा सकस आहार राज्यातील मुलांना मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार महिला व बाल विकास विभागास पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) सन २०१६-१७ करिता महिला व बाल विकास विभागास उपलब्ध झालेल्या नियतव्ययाच्या प्रमाणात राज्यातील बालगृहांच्या सहाय्यक अनुदानापोटी निधी अर्थसंकल्पित केला आहे. वित्त विभागाने अर्थसंकल्पित निधीच्या ८० टक्केच्या प्रमाणात निधी वितरीत केल्यानुसार रू.२०.९७ कोटी इतका निधी महिला व बाल विकास आयुक्तालय यांना उपलब्ध करून दिलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.